**ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता कार्यक्रम पाणी गुणवत्ता संनियंत्रण, पाणी गुणवत्ता नियंत्रण आणि पाणी गुणवत्ता सर्वेक्षण.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : ग्रापापु-१०९६/प्र.क्र.१२८०/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : २८ नोव्हेंबर, १९९६.**

**पहावे:** १) शासन निर्णय क्रमांक : ग्रापापु १०९१/सीआर २६७/३९-अ, दिनांक १०.०९.९१.
२) ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक : ग्रापापु १०९१/सीआर २६७/३९-अ, दिनांक १८.१२.९१
३) शासन निर्णय क्रमांक : टंचाई १०९१/ सीआर ३०८३/४३, दिनांक ०४.०३.९२
४) शासन निर्णय क्रमांक : ग्रापापु १०९४/सीआर ८९६/३९-अ, दिनांक १४.०६.९४.

**प्रस्तावना :** ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्यात राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांचा आढावा घेवून त्यात काय त्रुटी आहेत याचा अभ्यास करुन शासनाच्या असे लक्षात आले आहे कि राज्यातील ग्रामीण भागात पिण्याचे शुध्द व सुरक्षित पाणी उपलब्ध न झाल्यामुळे अतीसार, गॅस्ट्रो, काविळ, विषमज्वर यासारख्या जलजन्य व संसर्गजन्य रोगांना वेळोवेळी तोंड दयावे लागते. अनेकदा अशा रोगांचे प्रत्यावरोपण साथीच्या स्वरुपात होते. असेही दिसून आले आहे कि राज्यातील काही भागात शुध्द पिण्याच्या पाण्याची टंचाई उन्हाळयात कमी जास्त प्रमाणात जाणवू लागते. त्याचप्रमाणे पावसाळयामध्ये पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत/साठे दुषित/अशुध्द झाल्यामुळे शुध्द पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कमी होते. अशा प्रकारे ऋतूमानानुसार जलजन्य व संसर्गजन्य रोगांच्या साथी होण्याची मुख्य दोन कारणे आहेत.

या बाबींना आळा बसावा याकरीता योग्य त्या उपाय योजना करण्यासाठी संदर्भात नमूद केलेल्या परिपत्रकान्वये आणि शासन निर्णयान्वये पाणी शुध्दीकरण व साथरोग नियंत्रणाच्या संदर्भात विस्तृत सूचना देण्यात आलेल्या आहेत. अनुभवावरुन वरील शासन निर्णयान्वये आणि परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे एकत्रीकरण करुन तसेच या प्रकरणी करावयाची कार्यवाही ही अधिक निर्दोष, परिणामकारक व नियोजनबध्द व्हावी या दृष्टिने सर्वसमावेशक सूचना निर्ममित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. तरी प्रस्तावनेत दिलेले सर्व आदेश निष्कासित करुन खालीलप्रमाणे सर्व समावेशक आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली घेण्यात आलेल्या विविध योजनांतून शुध्द पिण्याचे पाणी मिळावे व साथ रोगास आळा बसावा या दृष्टीने महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम २६१ मधील तरतुदीचा वापर करुन शासन पुढीलप्रमाणे निर्देश देत आहे.

ग्रामीण भागांमध्ये शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी पाण्यांच्या गुणवत्तेचे संनियंत्रण करणे गरजेचे आहे.

पाणी गुणवत्ता संनियंत्रणाचे खालील तीन प्रमुख भाग आहेत

(अ) पाणी गुणवत्ता नियंत्रण

(ब) पाणी गुणवत्ता सर्वेक्षण आणि

(क) माहिती व्यवस्थापन प्रणाली.

**(अ) पाणी गुणवत्ता नियंत्रण :-**

पाणी पुरवठा व वितरण करणाऱ्या यंत्रणेने अथवा संस्थेने पाणी गुणवत्ता नियंत्रणाचे काम पाहावयाचे आहे. ग्रामीण जनतेला पिण्यास योग्य व जंतुविरहित पाणी नियमीतपणे पुरेशाप्रमाणात पुरवण्याची जबाबदारी अशा यंत्रणेची वा संस्थेची राहील. पाणी पुरवठाच्या नळ योजनेतील दोष वेळीच दूर करणे त्यासाठी लागणारी दुरुस्ती त्वरीत करुन घेणे, नळ योजनेच्या आसपासच्या परिसर स्वच्छ राखणे, पाण्याचे निर्जतुकीकरण करणे व पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी वेगवेगळया चाचण्या नियमित करणे हे ही अशा यंत्रणेचे वा संस्थेचे कर्तव्य राहील. वरील बाबीचा विचार करुन आता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**१) पाणी पुरवठा व वितरण करणारी यंत्रणा/संस्था ही, गुणवत्ता नियंत्रणासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे यथास्थित जबाबदार असेल.**

२) प्रादेशिक नळ योजनेच्या बाबतीत ही जबाबदारी पिण्याच्या पाण्याच्या उद्‌भवापासून ते पाणी वितरणाच्या टप्प्यापर्यत, जिल्हा परिषद किंवा परिसर अभियांत्रिकी विभागाची राहील.

३) पाणी वितरणाच्या टप्प्यापासून (गावातील पाण्याची टाकी) ते गावांतर्गत पाणी पुरवठा यंत्रणेच्या बाबतीत पाणी गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी त्या त्या ग्रामपंचायतीची वा गट ग्रामपंचायतीची राहील.

४) वैयक्तिक योजनेच्या बाबतीत आणि कुठलीच पाणी पुरवठा योजना अस्तित्वात नसल्यास (विहिरीचे पाणी किंवा हातपंपाचे पाणी ) पाणी गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील.

५) पाणी गुणवत्ता नियंत्रणातर्गत पाणी पुरवठा व वितरण करणाऱ्या यंत्रणेने खालील कर्तव्ये विहित पध्दतीने नियमितपणे पार पाडावयाची आहेत.

(अ) पाणी निर्जंतुक करण्यासाठी लागणाऱ्या टी.सी.एल. पावडरचा तीन महिने पुरेल इतका आणि योग्य गुणवत्ता असलेला साठा (पावडरमध्ये क्लोरीनचे प्रमाण ३३ टक्के असावे.) खरेदी करावा आणि त्याच्या योग्य साठवणीची व वितरणाची व्यवस्था करावी.

(ब) पाण्यात टी.सी.एल. ची पावडर योग्य प्रमाणात योग्य पध्दतीचा अवलंब करुन दररोज टाकून पाण्याचे निर्जंतुकीकरण करावे.

(क) पाण्यातील मुक्त क्लोरीनचे प्रमाण पाहण्यासाठी **दररोज** ऑर्थोटोलीडीन चाचणी ( ओ.टी.टेस्ट) करावी.

(ड) ओ.टी. चाचणी निगेटिव्ह येताच सुक्ष्मजंतू तपासणीसाठी पाण्याचा नमुना घ्यावा आणि तो तपासणीसाठी पाठवून दयावा. तसेच सदरील पाण्यामध्ये लगेच टी.सी.एल पावडर टाकून पाण्याचे निर्जंतुकीकरण करावे. घेतलेला पाण्याचा नमुना तपासणीसाठी जवळच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवावा.

(ई) परिसर अस्वच्छतेमुळे पिण्याच्या पाण्याचे प्रदुषण होणे संभवते म्हणून **परिशिष्ट १** मध्ये नमूद केल्याप्रमाणे पाण्याच्या स्त्रोताचा तसेच नळाच्या भोवतीचा आणि नळयोजनेचा परिसर स्वच्छ राखण्यासाठी योग्य ती उपाययोजना तातडीने करावी.

**(६) ग्राम पातळीवर पाणी गुणवत्ता नियंत्रण :**

(अ) ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रम ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेला कार्यक्रम आहे. या कार्याक्रमात ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग असावा या हेतूने ग्राम पातळीवर ग्राम पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता समित्या आस्थापित करण्यात याव्यात असे आदेश शासन देत आहे. ही समिती ग्राम पंचायतीला मार्गदर्शन देणे व मदत करण्याचे काम करेल.

(ब) विस्तार अधिकारी (आरोग्य) यांनी गट विकास अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम पातळीवर पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता समित्या तात्काळ आस्थापित करण्याची कार्यवाही करावी.

(क) ग्राम पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता समितीची रचना, कार्यक्षेत्र व कर्तव्ये परिशिष्ट १ मध्ये निर्देशिल्या प्रमाणे राहतील.

**(७) तालुका/गट पातळीवर पाणी गुणवत्ता नियंत्रण :**

(अ) तालुका/गट पातळीवर पाणी गुणवत्ता नियंत्रणाचे काम कनिष्ठ अभियंता (परिसर अभियांत्रिकी विभाग) यांचेकडे सोपविण्यात यावे. गट पाणी पुरवठा अधिकाऱ्याने त्यांच्या अधिनिस्त असलेल्या कनिष्ठ अभियंत्यापैकी एका कनिष्ठ अभियंत्यावर ही जबाबदारी सोपवावी व त्यास पाणी गुणवत्ता निरीक्षक असे संबोधावे.

(ब) पाणी गुणवत्ता निरीक्षक हा गट पाणी पुरवठा अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करेल. त्यांच्यावर गटविकास अधिकाऱ्याचेपण त्यांच्या कामावर देखरेख करण्याच्या दृष्टीने नियंत्रण राहील.

(क) पाणी गुणवत्ता निरीक्षकांनी तालुक्यातील सर्वच गावांना पुरवल्या जाणाऱ्या पाण्याची गुणवत्ता चांगली आहे किंवा नाही हे स्वतः चाचण्या करुन तपासून पहावे. एका महिन्यात त्यानी तालुकयातील किमान २० टक्के गावांना भेटी दयाव्या.

(ड) पाणी गुणवत्ता अयोग्य आढळल्यास त्यांनी तसे ग्राम पंचायत व गट विकास अधिकाऱ्यांना त्वरीत कळवावे.

(ई) पाणी गुणवत्ता निरीक्षकांनी तालुक्यातील सर्वच गावातील पिण्याच्या पाण्याचे उद्‌भव परिसर अस्वच्छतेमुळे दुषित होऊ नयेत म्हणून ठराविक कालावधीत परिसर स्वच्छता सर्वेक्षण करावे व त्याची नोंद नोंदवहीत घेवून त्याचा मासिक अहवाल कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद व गट विकास अधिकारी (पंचायत समिती ) यांना द्यावा.

(फ) ओ.टी. चाचणी, एफ.एफ.सी. चाचणी आणि परिसर स्वच्छता सर्वेक्षणाची वारंवारता **परिशिष्ट २** मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे राहील.

(ग) एखाद्या पाण्याच्या उद्‌भवाची एफ.एफ.सी. चाचणी पुन्हा पुन्हा पॉझीटिव्ह येत असल्यास पाणी नमुना सविस्तर चाचण्या करण्यासाठी जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाठवावा. त्या उद्‌भवाचे जवळपास शौचालय तर नाही ना या व इतर बाबीसाठी परिसराचे सर्वेक्षण करावे. प्रयोग शाळेच्या निष्कर्षाची माहिती ग्राम पाणी समिती, गट विकास अधिकारी व कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद यांना द्यावी.

**(८) गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी :**

(अ) विस्तार अधिकारी (आरोग्य) व ग्रामसेवक यांच्या मदतीने तालुक्यातील सर्वच गावांत पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता समित्या त्वरीत स्थापित करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन व नियत्रंण करावे. अशा स्थापन झालेल्या समित्यांना पाणी गुणवत्ता संनियत्रण तसेच पाणी पुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्तीसाठी प्रशिक्षण दिले जाईल याची काळजी घ्यावी. असे प्रशिक्षण, विस्तार अधिकारी (आरोग्य) यांनी कनिष्ठ अभियंता (सिंचन आणि पाणी पुरवठा ) आणि वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे मदतीने आयोजित करावे.

(ब) ग्रामसेवकाकडून पाणी पुरवठा व पाणी गुणवत्ता संनियंत्रणाच्या बाबतीतचा मासिक अहवाल घ्यावा, अहवालांची छाननी करुन ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस योग्य ते मार्गदर्शन करावे.

(क) तालुक्यातील सर्व गावांचे मासिक अहवालाचे एकत्रिकरण करुन तो अहवाल जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना पुढील महिन्याचे १० तारखेचे आत पाठवावा.

(ड) तालुक्यातील ग्रामपंचायती प्रादेशिक नळ योजनांच्या बाबतीत पाणीपट्टी जमा करुन त्याचा ८० टक्के भाग जिल्हा परिषदेला देत आहेत व उर्वरित २० टक्के निधीचा विनियोग योग्य कामासाठीच केला जात आहे तसेच स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत पाणीपट्टी जमा करुन तिचा २० टक्के भाग जिल्हा परिषदेला व उर्वरित ८० टक्के भागाचा विनियोग ग्रामपंचायत स्तरावर पाणी पुरवठा कामासाठी केला जात आहे व त्याचे हिशोब ठेवले जात आहेत याबाबीवर सनियंत्रण ठेवावे.

(ई) ज्या ग्रामपंचायतीकडे पाणी पुरवठा यंत्रणा चालविण्यासाठी खरोखरच निधी अपुरा पडत आहे त्याना जास्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शिफारस करावी. हा निधी जिल्हा परिषदेच्या देखभाल व दुरुस्ती निधीमधून देण्यात यावा. त्यासाठी सदरील निधीमधून अनुदान मिळविण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी जिल्हा पाणी पुरवठा अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करावा.

**(९) जिल्हा पातळीवर पाणी गुणवत्ता नियंत्रण :**

(अ) पाणी गुणवत्ता नियंत्रणाचे व्यवस्थापन पाणी पुरवठा अधिकारी (पाणी व्यवस्थापन कक्ष) हे पाहतील.

(ब) ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे व्यवस्थापन व देखभाल करण्यासाठी जळगांव जिल्हा परिषदे अंतर्गत एक स्वतंत्र पाणी व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाकडे पाणी गुणवत्ता नियंत्रणाचे देखील काम सोपविण्यात आले आहे. अशाच तऱ्हेचा पाणी व्यवस्थापन कक्ष इतर सर्व जिल्हा परिषदे अंतर्गत स्थापन करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. या कक्षाचा प्रमुख कार्यकारी अभियंता असतील. हा कक्ष जलसंधारण व पाणी पुरवठा समितीच्या अंतर्गत असेल. जो पर्यत जिल्हा परिषदांमध्ये असा पाणी व्यवस्थापन कक्ष अस्तित्वात येत नाही तोपर्यत जिल्हा परिषद पातळीवर पाणी गुणवत्ता नियंत्रणाचे काम कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग यांनी पहावे .कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा ही पदे लवकरच निर्माण करण्यात येणार आहेत. सदर पदे निर्माण झाल्यानंतर ही जबाबदारी त्यांची राहील.

**(१०) पाणी पुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती :**

(अ) परिसर अभियांत्रिकीने तयार केलेल्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेने ताब्यात घ्यावी. अशा योजनेच्या पाण्याच्या स्त्रोतापासून ते गावांतील पाण्याच्या टाकीपर्यत जिल्हा परिषदेने व्यवस्थापन करावे आणि पाण्याच्या टाकीपासून गावांतर्गतची पाणी वितरण व्यवस्था ग्राम पंचायतीकडे

सोपवावी. वैयक्तिक योजनांच्या बाबतीत पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधित ग्राम पंचायतीची असेल.

(ब) शासनाच्या असे निदर्शनास आले आहे कि जिल्हा परिषदांना प्रादेशिक पाणी पुरवठा योजना समाधानकारकरित्या चालविण्यासाठी अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. याबाबत कारणांचा शोध घेतला असता असे निदर्शनास आले आहे कि अडचणींची मूळ कारणे खालील प्रमाणे आहेत :-

(१) पाणी पुरवठा योजना चालवण्यासाठी आणि योजनांची देखभाल करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी वृंदाचा अभाव.

(२) पुरेसा निधी उपलब्ध नसणे, वित्तीय तरतुदीचा अभाव.

(३) योजनावरील खर्चाचे वार्षिक नियोजन, खर्चाच्या तपशीलवार नोंदी व खर्चावरील नियंत्रणाचा अभाव.

(क) वरील बाबी लक्षात घेवून आता असे निर्देशित करण्यात येत आहे कि जिल्हा परिषदांनी/ग्रामपंचायतीनी पाणी पुरवठा योजना ताब्यात घेताना योजना चालविण्यासाठी व देखभालीसाठी आणि दुरुस्तीसाठी आवश्यक त्या संख्येत प्रशिक्षित कर्मचारी वृंदाची नियुक्ती करावी.

(ड) प्रादेशिक नळ योजनांच्या संदर्भात पाणी शुध्दीकरणाची, परिसर स्वच्छता ठेवण्याची व संभाव्य प्रदुषण टाळण्यासाठी योग्य ती दुरुस्ती करण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेची राहील. परंतु गावांतर्गतच्या पाणी पुरवठया बाबतची वरील जबाबदारी संबंधित ग्राम पंचायतीची राहील.

(ई) परिसर अभियांत्रिकी विभागाकडून कार्यान्वित करण्यात आलेल्या परंतु जिल्हा परिषदेकडे किंवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरीत न झालेल्या योजनांच्या संदर्भात वरील जबाबदारी ही संबंधित परिसर अभियांत्रिकी विभागाच्या अभियंत्याची असेल.

(फ) पाणी शुध्दीकरण केंद्रात पाण्याचे शुध्दीकरण करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी वृंद नेमावा व अशा केंद्रात :

(१) तीन महिने पुरेल इतका टी.सी.एल. पावडरचा आणि तुरटीचा साठा सदैव उपलब्ध राहील याची जबाबदारी जिल्हा परिषदेची असेल. साठा कमी झाल्यास, ग्राम पंचायतीला तात्काळ घेण्यास सांगावे व ग्राम पंचायतीने ३० दिवसांत न घेतल्यास, जिल्हा परिषदेने खरेदी करुन ग्राम पंचायतीला पाठवावे. म्हणजे साठा एक महिन्याच्या गरजेपेक्षा कमी होण्यापूर्वीच प्राप्त होईल त्यासाठी खर्च ग्राम पंचायतीकडून यथावकाश वसूल करावा.

(२) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत ओ.टी. चाचणी आणि एफ. एफ. सी चाचण्या करण्याची सोय जिल्हा परिषदेने करावी.

**(११) पाणी गुणवत्ता नियंत्रणासाठी लागणारा निधी :**

(अ) शासनाने सन १९८६ मध्ये जिल्हा स्तरावर देखभाल व दुरुस्ती निधी स्थापन केला आहे. सदर निधीत, संबंधित जिल्हा परिषदेने तिच्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के निधी जमा करावयाचा असतो. या निधीमध्ये ग्राम पातळीवरुन जमा होणाऱ्या पाणीपट्टीचा निधीही जमा होईल. प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत ग्राम पंचायतीने जमा केलेल्या पाणी पट्टीच्या ऐंशी टक्के भाग जिल्हा परिषदेच्या सदरील निधीत जमा करावा व वैयक्तिक योजनांच्या बाबतीत वीस टक्के भाग जमा करावा.

(ब) जिल्हा परिषदांनी या निधीचा विनियोग पाणी पुरवठा योजनांतर्गत पाण्याच्या उद्‌भवापासून ते समाविष्ट गावांच्या पाण्याच्या टाकीपर्यतच्या असलेल्या विविध उपांगाच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी करावा. यात कर्मचाऱ्यांचे वेतन, योजनेसाठी लागणारे सुटे भाग, योजनेच्या वीज बिलावरील खर्च, पाणी शुध्दीकरणासाठी, लागणारे टी.सी.एल. पावडर आणि तुरटीची खरेदी इत्यादी बाबींचा समावेश असावा.

(क) या निधीमधून ग्रामपंचायतींनापण पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी लागणारा जादा निधी देता येईल.

**(१२) टी.सी.एल. पावडर व तत्सम द्रव्ये यांची खरेदी :**

(अ) राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत टी.सी.एल. पावडर निर्मात्या कंपन्याबरोबर खरेदीचे दर ठरविले जावेत, खरेदीचे दर ठरविले जात असताना सदरील कंपनीचे टी.सी.एल. योग्य त्या गुणवत्तेचे आहे किंवा नाही (पावडरमध्ये क्लोरीनचे प्रमाण ३३ टक्के असावे) याची अगोदरच चाचणी करुन घेण्यात यावी. यासाठी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे या संस्थेकडे टी.सी.एल. पावडरचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात यावेत व सदरील संस्थेने चाचणीसाठी पाठविलेल्या टी.सी.एल.ची गुणवत्ता चांगली आहे असे प्रमाणित केल्यानंतरच सदर कंपनीच्या टी.सी.एल. च्या खरेदीचे दर ठरविण्यात यावेत.

(ब) शासनच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने टी.सी.एल.पावडर ५०० ग्रॅम किंवा १ किलोच्या गठ्ठ्यात पुरवठा करण्याबाबत निर्मात्यांना सांगावे.

(क) जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्राम पंचायतीनी टी.सी.एल. पावडरच्या खरेदी करण्या अगोदर खरेदी करावयाच्या टी.सी.एल. पावडरची गुणवत्ता चाचणी जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत टी.सी.एल. चा नमुना पाठवून करुन घ्यावी. गुणवत्ता चांगली असल्यास तीन महिने पुरेल इतका टी.सी.एल. चा साठा खरेदी करावा, त्यापेक्षा जास्त टी.सी.एल. खरेदी करुन नये.

(ड) जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी टी.सी.एल. पावडर किंवा तत्सम द्रव्ये (द्रवरुप क्लोरीन आणि क्लोरीन गोळया) यांची खरेदी करताना शासनाने केलेल्या दरकरारास अधिन राहून जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, लेखासंहिता १९६८ मधील तरतूदी अनुसार करावी.

(ई) ग्राम पंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांमार्फत खरेदी केलेल्या टी.सी.एल. पावडर खरेदीवर येणाऱ्या एकूण खर्चाच्या ५० टक्के इतकी रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान म्हणून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर कार्यक्रम महाराष्ट्र जिल्हा परिषदा, व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १०० अन्वये संदर्भातील अनुक्रमांक ५ अनुसार हस्तांतरित झालेला असल्याने सदर योजना यापुढेही हस्तांतरित योजना म्हणून राहील. संदर्भातील अनुक्रमांक ५ अनुसार याबाबतची कार्य प्रणाली पुढीलप्रमाणे राहील.

(१) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या पाणी शुध्दीकरणासाठी लागणाऱ्या टी.सी.एल. पावडरची खरेदी ग्राम पंचायती, पंचायत समित्या वा जिल्हा परिषदा यांनी नेहमीच्या विहित पध्दतीप्रमाणे प्रथम स्वतःच्या निधीतून करावी, **ही खरेदी करण्याची जबाबदारी ग्रामपातळीवर ग्राम पाणी व स्वच्छता समिती / ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती, आणि जिल्हा पातळीवर पाणी व्यवस्थापन कक्षाची राहील.** ज्या जिल्हयात जिल्हा पातळीवर पाणी व्यवस्थापन कक्ष स्थापन झाला नसेल तेथे ही जबाबदारी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग यांचे राहील.

(२) वरीलप्रमाणे टी.सी.एल. पावडरची खरेदी केल्यानंतर याबाबतची देयके संबंधित ग्रामपंचायती, व पंचायत समित्यांनी जिल्हा परिषदेकडे छाननीसाठी व प्रतिपूर्तीसाठी पाठवावीत.

(३) वरील (२) येथे नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायत व पंचायत समितीकडून मिळालेली टी.सी.एल पावडची देयके संबंधित जिल्हा परिषदेने छाननी करावी व ती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर संबंधित संस्थांना ५० टक्के अनुदान प्रतिपुर्तीचे स्वरुपात मंजूर करावे.

(४) जिल्हा परिषदेने टी.सी.एल. पावडरची खरेदी प्रथम त्यांचे निधीतून करुन त्यानंतर याबाबतच्या देयकांची छाननी जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने करुन मान्य खर्चाच्या ५० टक्के रक्कम प्रतीपूर्तिच्या स्वरुपात खालील (६) येथे नमूद केल्याप्रमाणे राज्य शासनाने दिलेल्या अनुदानातून समायोजित करुन घ्यावी.

(५) ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा यांना टी.सी.एल. पावडर खरेदी खर्चाच्या ५० टक्के देण्यात येणारे अनुदान हे दिनांक ०१ एप्रिल, १९९६ पासून पुढे खरेदी केलेल्या टी.सी.एल. पावडरच्या खरेदीवर अनुज्ञेय राहील.

(६)  याबाबतचा खर्च मागणी क्रमांक वाय-०६, ३६०४, स्थानिक संस्था व पंचायती राज्य संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकीत रकमा देणे, (दोन) पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत पाणी शुध्दीकरणासाठी लागणाऱ्या टी.सी.एल. पावडर खरेदीवर येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के पर्यंत अनुदान जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतीना देणे (३६०४-०४८-८) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखालील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

(१३) वरील स्थानिक स्वराज्य संस्थांनी खरेदी केलेल्या टी.सी.एल. ची साठवण योग्य रितीने करावी.

(अ) टी.सी.एल. पावडर ठेवलेली जागा कोरडी असावी, ओलसर असू नये.

(ब) टी.सी.एल. चा डबा वा पाकीट बंद राहील, उघडा राहणार नाही. याची काळजी घ्यावी.

(क) टी.सी.एल. पावडर सुर्यप्रकाशात ठेवू नये.

(ड) टी.सी.एल. पावडरचे वितरण करताना सुध्दा वरील (अ) ते (क) मधील बाबीं विचारात घ्यावात.

(इ) विहिरींच्या पाण्याचे निर्जुंतुकीकरण करण्यासाठी टी.सी.एल. पावडर साठयापासून ते विहिरीपर्यंत उघडया बकेटात घेवून जाऊ नये, ती बंद पाकिटातच घेवून जावे व जातेवेळी सुर्यप्रकाशापासून सुरक्षित ठेवावे. अन्यथा पावडरमधील क्लोरीनचे प्रमाण कमी होईल.

(फ) वरील स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्याकडे असलेल्या टी.सी.एल. पावडरमधील क्लोरीनचे प्रमाण योग्य आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी दर आठवडयात साठयातील टी.सी.एल. चा नमुना जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठवावा.

(१४) स्थानिक स्वराज्य संस्थांनी टी.सी.एल. पावडर किंवा तत्सम द्रव्यासाठी लागणारा निधी उपलब्ध होण्यासाठी त्याचे नियोजन दरवर्षी पुढील वर्षाचे अंदाजपत्रक अंतिम होण्यापूर्वीच करावे व त्यानुसार अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद करण्यात यावी.

(१५) टी.सी.एल. पावडरची खरेदी, त्याची योग्य साठवण, गुणवत्ता चाचणी आणि त्याचे योग्य वितरणाचे संनियत्रंण जिल्हा स्तरावर पाणी व्यवस्थापन कक्षातील कार्यकारी अभियंता किंवा सदरील कक्ष अस्तित्वात आला नसल्यास कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग यांना करावयाचे असून गट स्तरावर ही जबाबदारी संबंधित गटविकास अधिकारी यांची राहील.

(१६) वरील दोन्ही अधिकाऱ्यांनी खरेदी केलेल्या टी.सी.एल. पावडरचे वाटप व विनियोग योग्य तऱ्हेने सर्व स्तरावर होईल हे कटाक्षाने पहावे. सदर प्रकरणी आवश्यकतेनुसार तांत्रिक सहकार्य (टी.सी.एल. पावडरची गुणवत्ता ठरवणे) जिल्हा परिषद स्तरावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तर पंचायत समिती स्तरावर वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी करावे.

(१७) साथरोगांचे नियंत्रण करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागास द्रवरुप क्लोरीन किंवा क्लोरीन गोळयांचा साठा प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात व उपकेंद्रात ठेवावा लागेल. अशा द्रवरुप क्लोरीनची व क्लोरीन गोळयांची खरेदी व वितरण सार्वजनिक आरोग्य विभागानेच करावे.

**(ब) पाणी गुणवत्ता सर्वेक्षण :**

पाणी पुरवठा व वितरण करणाऱ्या यंत्रणा योग्य गुणवत्तेचे पाणी उपलब्ध करुन देतात किंवा नाही याची पडताळणी करणारी यंत्रणा ही स्वतंत्र असावी. ऋतुमानांनुसार पाण्याच्या गुणवत्तेमध्ये काही बदल आढळत असतील. तर (सिझनल ट्रेन्ड) चे निश्चित करणे, पाणी दुषित होण्याची मुळ कारणे शोधने आणि त्यावर करावयाच्या उपाय योजनेबाबत सल्ला देणे, पाणी पुरवठा योजने अंतर्गतच्या विविध उपांगाची सुरक्षितता व परिणामकारकता आजमावणे व त्याबाबतही सल्ला देणे इत्यादी पाणी गुणवत्ता सर्वेक्षणाच्या कामाची जबाबदारी राज्यशासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाची राहील. जिल्हा पातळीवर पाणी गुणवत्ता सर्वेक्षणाची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची राहील. सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रत्येक ग्रामीण रुग्णालयात एफ.एफ.सी. चाचणी करण्यासाठी सुविधा निर्माण कराव्यात.

पाणी गुणवत्ता सर्वेक्षणातंर्गत आरोग्य विभागाने खालील बाबी विहित पध्दतीने व नियमितपणे, परिशिष्ट-२ अनुसार पार पाडावयाच्या आहेत.

(१)पाण्याचे निर्जतुकीकरण केले जाते किंवा नाही हे पाहण्यासाठी पाण्याची ओ.टी. चाचणी करणे.
(२)ओ.टी. चाचणी निगेटिव्ह असल्यास पाणी नमुना जंतु परिक्षणासाठी (एफ.एफ.सी.चाचणी) पाठवणे.
(३)पाणी दुषित होण्याची संभाव्य कारणे शोधण्यासाठी आकस्मिक परिसर स्वच्छता सर्वेक्षण करणे.

**(अ) ग्रामपातळीवर**

(१)गांव पातळीवर पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी बहुउद्देशिय कर्मचाऱ्याने पाण्याची ओ.टी. चाचणी करावी.

(२)अशी ओ.टी. चाचणी नळयोजनेच्या बाबतीत गावांतील त्या त्या भागाच्या शेवटच्या नळापासून सुरुवात करुन, पुढील काही नळाच्या पाण्याची व घरातील साठविलेल्या पाण्याची चाचणी करावी. विहिरींच्या बाबतीत सर्वच पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची चाचणी करावी.

(३)पिण्याचे पाणी साठविण्याची वा पाणी पिण्यासाठी घेण्याची पध्दत जर योग्य नसेल तर पाणी दुषित होऊ शकते म्हणून गावाच्या प्रत्येक भागातील काही घरातील पिण्यासाठी साठवलेल्या पाण्याची पण ओ.टी. चाचणी करावी.

(४)ओ.टी. चाचणीचे निष्कर्ष बहुउद्देशिय कर्मचाऱ्यांनी नोंदवहीत नोंदवावेत. ओ.टी. निगेटिव्ह असल्यास ते ग्रामीण पाणी पुरवठा कर्मचारी किंवा ग्राम पाणी पुरवठा समितीच्या निदर्शनास आणून द्यावे.

पाणी साठवण्याची व पाणी घेण्याच्या अयोग्य पध्दतीमुळे पाण्याचे प्रदुषण संभवत असल्यास ग्रामपाणी समितीच्या सहाय्याने जनतेला आरोग्य शिक्षण द्यावे.

(५)ओ.टी निगेटिव्ह असल्यास सुक्ष्म जंतू तपासणीसाठी पाणी नमुना घ्यावा व संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रात द्यावा.

(६)प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पाणी नमुने ग्रामीण रुग्णालयास एफ.एफ.सी. चाचणीसाठी पाठवावेत. सदरील चाचणीचा निष्कर्ष ग्राम पंचायतीस/ग्रामपाणी समितीस किंवा ग्रामपाणी कर्मचारी किंवा ग्रामसेवकांस कळवावा.

(७)एखाद्या पाणी उद्‌भवाची एफ.एफ.सी. चाचणी पुन्हा पुन्हा पॉझीटिव्ह येत असल्यास सदरील उद्‌भवाच्या पाण्याचा नमुना सविस्तर सुक्ष्म जंतू तपासणीसाठी जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोग शाळेस पाठवावे, व उद्‌भवाच्या परिसराचे स्वच्छतेच्या बाबतीत सर्वेक्षण करुन प्रदुषणाचे कारण शोधावे व त्यावर उपाय ग्रामपंचायतीस सुचवावे.

(८)प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सहाय्यकांनी बहुउद्देशिय कर्मचाऱ्यांना या कामी मार्गदर्शन करावे व त्यांच्या कामाचे पर्यवक्षण व सनियंत्रण करावे.

(९) बहुउद्देशिय कर्मचाऱ्यांनी पाणी तपासणीचा मासिक अहवाल वैद्यकीय अधिकाऱ्याला द्यावा.

(१०)वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राचा संकलित अहवाल प्रत्येक महिन्यात १० तारखेच्या आत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पाठवावा व त्याची प्रत गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना द्यावी.

**(ब) तालुकापातळीवर :-**

(१)पाणी पुरवठा योजनाची दुरुस्ती व देखभाल वेळीच व्हावी यासाठी शासनाने ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक ग्रापापु-१०९३/सीआर८३१/३९-अ, दिनांक ११ जानेवारी, १९९४ च्या परिपत्रकान्वये जिल्हयातील सर्व पूर्ण व कार्यान्वीत योजनांचे सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश दिले आहेत. सदर आदेशानुसार जिल्हयातील सर्व योजनांचे सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश दिले आहेत. सदर आदेशानुसार जिल्हयातील सर्व योजनांचे सर्वेक्षण दरवर्षी ऑक्टोबर, ते जानेवारी या कालावधीत करावयाचे आहे.

(२)या सर्वेक्षणामध्ये गटपातळीवरील विस्तार अधिकारी (आरोग्य), पाणी गुणवत्ता निरीक्षक, पाणी गुणवत्ता पर्यवेक्षकांची नेमणूक झाली नसल्यास कनिष्ठ अभियंता (सिंचन व पाणी पुरवठा), वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, त्या त्या भागात कार्यरत बहुउद्देशिय कर्मचारी व आरोग्य सहाय्यक यांनी भाग घ्यावयाचा आहे. याबाबतची जबाबदारी विस्तार अधिकारी (आरोग्य) यांची राहील.

(३)सदरील सर्वेक्षणात फक्त तांत्रिक स्थापत्य विषयक बाबीकडे लक्ष न देता संबंधित गावात/वाडीत परिसर स्वच्छतेची परिस्थिती कशी आहे. तसेच तेथे पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक औषधी द्रव्ये उपलब्ध आहेत किंवा कसे याकडेही लक्ष द्यावे.

(४)असे सर्वेक्षण ज्या गावात पाणी पुरवठयाची कोणतीही योजना नाही आणि ग्रामस्थ पिण्यासाठी विहिरीचे किंवा हातपंपाचे पाणी वापरतात अशा गावाचेही करण्यात यावे.

(५)एखाद्या पाणी उद्‌भवाची एफ.एफ.सी. चाचणी पुन्हा पुन्हा पॉझीटिव्ह येत असल्यास सदरील उद्‌भवाच्या पाण्याचा नमुना सविस्तर सुक्ष्म जंतू तपासणीसाठी जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोग शाळेस पाठवावे, या उद्‌भवाच्या परिसराचे स्वच्छतेच्या बाबतीत सर्वेक्षणकरुन प्रदुषणाचे कारण शोधावे व त्यावर उपाय ग्राम पंचायतीस सुचवावे.

(६)ज्या गावात/वाडीत योजनेच्या बांधकामात बिघाड झाल्यामुळे किंवा तेथे पाणी शुध्दीकरण व्यवस्थित होत नसल्यामुळे किंवा योजनेच्या जवळपासचा परिसर अस्वच्छ असल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे पाणी पुरवठा सुरक्षित नसेल अशा गावाविषयी/वाडयांविषयी संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शासनाने विहित केलेले **लाल रंगाचे प्रमाणपत्र (लाल कार्ड)** देणे आवश्यक राहील. तसेच ज्या गावांतील/वाडयांतील योजनांचे पाणी पिण्याच्या दृष्टीने सुरक्षित असेल त्या गांवाविषयी/वाडयांविषयी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विहित हिरव्या रंगाचे प्रमाणपत्र (हिरवे काडे) द्यावे. अशाप्रकारे सर्वेक्षण दरवर्षी माहे ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत पूर्ण झाल्यानंतर त्याचा एकत्रित अहवाल गट विकास अधिकाऱ्यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना द्यावा, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे जो एकत्रित अहवाल प्राप्त होईल त्या आधारे पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. सर्वेक्षणाचे काम योग्य रितीने होत आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील.

**(क) जिल्हा पातळीवर :-**

(१)जिल्हा पाणी पुरवठा समितीने सदर सर्वेक्षणात आढळून आलेल्या योजनांच्या त्रुटीचा आढावा विनाविलंब घेवून ज्या गावांसाठी/वाडयांसाठी लाल रंगाचे प्रमाणपत्र प्राप्त झाले असतील अशा ठिकाणी पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती, पाण्याचे प्रदुषण थांबविण्यासाठी व शुध्द पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने, करणे आवश्यक असल्यास, अशा योजनांच्या दुरुस्तीचा कालबध्द कृती आराखडा आखून सदर कृती आराखडयास जिल्हा पाणी पुरवठा समितीची मान्यता घ्यावी.

पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती वेळीच होते किंवा नाही हे पाहण्याची व त्यानुसार जबाबदारी जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी पुरवठा समिती व तिची कार्यकारी समिती (ग्रामीण पाणी पुरवठा) यांचा तसेच वैयक्तिकरित्या या कामास जिल्हा परिषदेच्या पाणी व्यवस्थापन कक्षाचे कार्यकारी अभियंता,

हा कक्ष अस्तित्वात आला नसल्यास लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता व परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभागाकडील योजनांच्या संदर्भात कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग हे जबाबदार राहतील.

(२)लाल रंगाचे प्रमाण पत्र मिळालेल्या गावातील/वाडयातील सर्व पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती मे महिना अखेर पर्यत पूर्ण करणे आवश्यक राहील.

(३)लाल रंगाचे प्रमाणपत्र मिळालेल्या गावांतील/वाडयातील पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती करण्यासाठी योग्य ती कार्यवाही पावसाळयापूर्वी केली जाईल हे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कटाक्षाने पहावयाचे आहे.

(४)पावसाळा सुरु होण्यापूर्वी मे महिन्याच्या अखेर किंवा जून महिन्याच्या सुरुवांतीस पूर्वी लाल रंगाचे प्रमाणपत्र मिळालेल्या प्रत्येक गावांस/वाडयांस संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी परत भेट देवून तेथे पाणी पुरवठा सुरक्षित व्हावा या दृष्टीने आवश्यक ती सुधारणात्मक कार्यवाही करण्यात आली आहे किंवा कसे हे स्वत: पाहून पुढील पावसाळयात तेथे पाणी पुरवठा सुरक्षित/असुरक्षित असल्यास अनुक्रमे हिरव्या रंगाचे/लाल रंगाचे प्रमाणपत्र विहित प्रपत्रात द्यावे.

(५) वरीलप्रमाणे फेरसर्वेक्षणामध्ये लाल रंगाचे प्रमाणपत्र मिळालेल्या गावांत/वाडयांत दूषित पाणी पुरवठयांमुळे साथ उद्रेक झाल्यास (अ)असा साथीचा उद्रेक टी.सी.एल. पावडरच्या वापरातील त्रुटीमुळे झाल्या असल्यास या साथ उद्रेकांसाठी गाव पातळीवर ग्रामपंचायत आणि वैयक्तिक रित्या ग्रामसेवक तसेच तालुका पातळीवर पंचायत समिती आणि वैयक्तिकरित्या गटविकास अधिकारी/गट पाणी पुरवठा अधिकारी तसेच जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद आणि वैयक्तिकरित्या मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी हे जबाबदार राहतील. (ब) साथीचा उद्रेक पाणी पुरवठा यंत्रणेतील दोषामुळे किंवा पाणी पुरवठा यंत्रणेची अपेक्षित दुरुस्ती वेळेवर न केल्यामुळे झाला असल्यास त्यास संबंधित ग्रामपंचायत व वैयक्तिकरित्या ग्रामसेवक तसेच तालुका पातळीवरील पाणी पुरवठा निरीक्षक आणि जिल्हा पातळीवर कार्यकारी अभियंता (पाणी व्यवस्थापन कक्ष) किंवा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग हे जबाबदार राहतील. परिसर अस्वच्छतेमुळे अशुध्द पाणी पुरवठा झाल्यास त्यास संबंधित ग्राम पंचायतीस जबाबदार धरले जाईल.

**(ड) शुध्द पाणी पुरवठा व साथरोग नियंत्रण कामावर संनियत्रण**

(१)पाणी पुरवठा योजनांचे नियमित सर्वेक्षण करणे, त्यानुषंगाने आवश्यक दुरुस्ती वेळेवर करणे या संपूर्ण कामाचे पर्यवेक्षण व संनियत्रण करण्याची सर्वसाधारण जबाबदारी जिल्हा स्तरावर 'जिल्हा पाणी पुरवठा समितीची' जिल्हा परिषद स्तरावर पाणी व्यवस्थापन कक्ष किंवा जलसंधारण व पिण्याचे पाणी

पुरवठा समितीची आणि वैयक्तिक स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची व जिल्हा पाणी पुरवठा अधिकाऱ्यांची राहील.

(२) विभागीय स्तरावर विभागीय आयुक्तांनी पाणी पुरवठा नियंत्रण आणि सर्वेक्षण या दोन्ही बाबतीत नियमितपणे दरमहा आढावा घेऊन याचे संनियत्रण करावे व त्याचा अहवाल शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत पाठवावा.

(३) परिसर स्वच्छतेविषयी व पाणी शुध्दीकरणाविषयी ग्राम पातळीवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा स्तरावर जलसंधारण व जिल्हा पाणी पुरवठा समितीची व वैयक्तिक रित्या मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी यांची राहील.

(४) जिल्हा परिषदेच्या जलसंधारण व पिण्याचे पाणी पुरवठा समितीने खालील बाबीचे नियमित सनियत्रंण करावयाचे आहे.

(अ)टी.सी.एल.पावडरची उपलब्धता सर्व स्तरावर आहे किंवा नाही याचा दरमहा आढावा घेणे.
(ब)पाणी नमुना तपासणीच्या अहवालाचा दरमहा आढावा घेणे.
(क)टी.सी.एल. पावडरच्या नमुने तपासणीच्या अहवालाचा दरमहा आढावा घेणे.
(ड)कमी दर्जाची टी.सी.एल.पावडर पुरविणाऱ्या उत्पादकावर नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी ग्राम पंचायतीने उत्पादकाचे नाव जलसंधारण व पाणी पुरवठा समितीस कळवावे. सदरील समितीने संस्थेविरुध्द कार्यवाही करण्यासाठी शासनास कळवावे.

(५) विभागीय मुख्य अभियंत्यानी दरवर्षी जून महिन्यात वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेल्या लाल रंगाच्या व हिरव्या रंगाच्या प्रमाणपत्रे मिळालेल्या गावांचा आढावा घ्यावा आणि विभागातील त्या जिल्हा परिषदा/पंचायत समित्या व ग्रामपंचायतीनी उल्लेखनीय कामगिरी केली असेल त्या त्या संस्थांना सोनेरी रंगाचे प्रमाणपत्र (प्रशस्तीपत्र) देण्यात यावे.

**(६)पाणी शुध्दीकरणकामी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही न केल्यास यासाठी वैयक्तिकरित्या जे कर्मचारी/अधिकारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.**

(७) ग्रामपंचायतीने त्यांना नेमून दिलेली जबाबदारी योग्यप्रकारे पार न पाडल्यास संबंधित ग्रामपंचायतीच्या सरपंचा विरुध्द मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम-३९ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. ग्रामसेवक कार्यवाही न करण्यास जबाबदार आढळल्यावर त्याचे विरुध्द नियमानुसार विभागीय चौकशी करण्यात यावी.

(८) पावसाळा सुरु होण्यापूर्वी एखाद्या पंचायत समिती क्षेत्रातील ५० टक्के पेक्षा जास्त गावांत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी फेरसर्वेक्षणाअंती दिलेली प्रमाणपत्रे लाल रंगाची असतील तर सर्वसाधारणपणे

संबंधित पंचायत समितीस आणि वैयक्तिकरित्या गटविकास अधिकारी आणि पाणी पुरवठा निरिक्षक यांना जबाबदार धरुन यांच्याविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी.

(९) ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांनी या योजनेतर्गत त्याच्यांवर सोपविण्यात आलेली जबाबदारी पाड पाडली नाही तर यथास्थित मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील तरतूदीनुसार त्यांच्या विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**(क) माहिती व्यवस्थापन प्रणाली :**

प्रत्येक पातळीवर पाणी गुणवत्ता संनियंत्रणांतर्गत केल्या जात असलेल्या कामाची वस्तुनिष्ठ माहिती विहित नमुन्यात व ठराविक कालावधीत योग्य त्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना मिळणे अत्यंत महत्वाचे असते, त्यामुळे पुढील कालावधीसाठी करावयाचे कामाचे नियोजन, तातडीने हाती घ्यावयाची कामे, आढळलेल्या त्रुटी दूर करणे, कामाचे संनियत्रंण करणे व वेगवेगळया विभागांचा समन्वय साधणे, आर्थिक तरतूद करणे इत्यादी बाबतीत महत्वाचे निर्णय घेणे सुकर होते. त्यामुळे केलेल्या कामांचे अहवाल वस्तुनिष्ठ व अचुक असले पाहिजेत आणि योग्य वेळेत योग्य त्या अधिकाऱ्यास वा कर्मचाऱ्यांस मिळाले पाहिजेत अन्यथा चुकीच्या माहितीमुळे किंवा अपुर्ण माहितीमुळे चुकीचा निर्णय घेतला जावू शकतो. अहवाल देण्यात दिरंगाई झाल्यास निर्णय घेण्यासपण दिरंगाई होते,याचे पर्यावसान साथरोग येण्यात होऊ शकते. म्हणून केलेल्या कामाची अचूक माहिती व ठराविक तारखेस पाठवण्याचे व त्या अहवालावरुन योग्य तो निर्णय घेवून अहवाल पाठवणाऱ्या अधिकाऱ्यास वा कर्मचाऱ्यास मार्गदर्शन वा आदेश ठराविक तारखेस पाठवण्याचे गांभीर्य सर्व संबंधितांना कळले पाहिजे आणि त्याप्रमाणे कृती झाली पाहिजे. सदरील अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**(१) पाणी गुणवत्ता नियंत्रणासाठी माहिती व्यवस्थापन प्रणाली :-**

(अ)गावपातळीवरील पाणी पुरवठा कर्मचारी किंवा पाणी शुध्दीकरणांसाठी नेमलेल्या इतर व्यक्तीने पाण्याचे निर्जुंतुकीकरण, ओ.टी.चाचणी, एफ.एफ.सी. चाचणीचें निष्कर्ष विहित नमुन्यात दर आठवडयास ग्रामसेवकास द्यावेत. ग्रामसेवकांनी योग्य तो निर्णय पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांस पुढील आठवडयात कार्यान्वित करण्यासाठी सांगावेत.

(ब) पाणी पुरवठा कर्मचारी व इतर कर्मचारी यांनी वरील कार्यवाहीचा मासिक अहवाल विहित नमुन्यात गटविकास अधिकाऱ्यास प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस द्यावा. या अहवालाची चर्चा ग्रामपाणी समितीच्या मासिक सभेत करुन घेतलेले निर्णय पुढील महिन्यात कार्यान्वित करण्यासाठी ग्राम पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांस मार्गदर्शन करण्यात यावे.

(क) ग्रामसेवकांनी हा मासिक अहवाल गटविकास अधिकारी (पंचायत समिती) यांना दर महिन्यात ५ तारखेचे आत पोहोचेल असा पाठवावा आणि गटविकास अधिकाऱ्यांनी अहवालावरील त्यांचे अभिप्राय वा आदेश वा मार्गदर्शन ग्रामसेवकास दर महिन्यात ८ तारखेचे आत प्राप्त होतील असे पाठवावे.

(ड) गट विकास अधिकाऱ्यांनी (पंचायत समिती) ग्रामसेवकांच्या अहवालांचे संकलन करुन संकलीत मासिक अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना दर महिन्यात २० तारखेचे आत मिळेल असा पाठवावा. मुख्य कार्यकारी अधिकारी वा उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या अहवालावर त्यांचा अभिप्राय वा आदेश वा मार्गदर्शन गटविकास अधिकाऱ्यांस दर महिन्याच्या २५ तारखेच्या आत मिळेल असे पाठवावे.

(ई) पाणी गुणवत्ता निरीक्षक किंवा कनिष्ठ अभियंता (सिंचन व पाणी पुरवठा) यांनी ओ.टी. चाचणी, एफ.एफ.सी. चाचणी, स्वच्छता सर्वेक्षणाचा अहवाल दरमहा २ तारखेचे आत गटविकास अधिकारी (पंचायत समिती) आणि दरमहा ५ तारखेचे आत कार्यकारी अभियंता पाणी गुणवत्ता नियंत्रण व देखभाल पाणी व्यवस्थापन कक्ष जिल्हा परिषद यांना मिळेल अशा रितीने पाठवावा.

अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावरील अभिप्राय वा आदेश वा मार्गदर्शन गट विकास अधिकाऱ्यांनी आणि कार्यकारी अभियंता यांनी अनुक्रमे दर महिन्याच्या ५ तारखेच्या १० तारखेच्या आत पाणी गुणवत्ता पर्यवेक्षकास कळवावा.

(फ) कार्यकारी अभियंत्यांनी याबाबतचा संकलित मासिक अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दर महिन्यात ३० तारखेचे आत द्यावा. या अहवालावर जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा समितीच्या मासिक सभेत चर्चा व्हावी व घेतलेले निर्णय गट विकास अधिकाऱ्यांस दर महिन्यात २५ तारखेच्या आत कळवावेत, त्यावरुन गट विकास अधिकाऱ्यांनी पाणी गुणवत्ता निरीक्षकाबरोबर चर्चा करुन त्यांच्या पुढील कामाचे नियोजन करावे.

(ग) ग्रामीण रुग्णालयाच्या अधिकाक्षकांनी एफ.एफ.सी.चाचणीचा अहवाल पाणी नमुना पाठवणाऱ्या व्यक्तिस/संस्थेस पाणी नमुना मिळालेपासुन ४ दिवसाचे आत पोहचेल असा पाठवावा.

(ह) जिल्हा सार्वाजनिक आरोग्य प्रयोगशाळांनी पाण्याच्या नमुन्याचे सुक्ष्मजंतू परिक्षण अहवाल पाणी नमुना मिळालेपासून ८ दिवसाचे आत त्या व्यक्तिस/संस्थेस मिळेल असा पाठवावा.

(ज) ग्रामसेवकांनी पाणी गुणवत्ता संनियंत्रणासाठी झालेल्या मासिक खर्चाचा अहवाल गट विकास अधिकाऱ्यास दर महिन्यात ५ तारखेपर्यंत पाठवावा व गट विकास अधिकाऱ्यांनी संकलित मासिक खर्चाचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना १० तारखेपर्यंत मिळेल असा पाठवावा.

**(२) पाणी गुणवत्ता सर्वेक्षणासाठी माहिती व्यवस्थापन प्रणाली :-**

(अ)बहुउद्देशिय कर्मचारी आणि आरोग्य सहाय्यकांनी ओ.टी. चाचणी, एफ.एफ.सी. चाचणी आणि परिसर स्वच्छता सर्वेक्षणाचा मासिक अहवाल वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि गट विकास अधिकारी (पंचायत समिती) यांना प्रतिमाह अनुक्रमे २ तारखेस व ५ तारखेस द्यावा.

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बहुउद्देशिय कर्मचाऱ्यांच्या सभेत चर्चा करुन पाणी गुणवत्ता चांगली राखण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीचा अहवाल गट विकास अधिकाऱ्यांना दर महिन्यांच्या १० तारखेच्या पूर्वी मिळेल असा पाठवावा.

या अहवालात सुचविलेली कार्यवाही करण्यासाठीही माहिती पाणी गुणवत्ता निरीक्षकास गट विकास अधिकाऱ्यांनी द्यावी.

(ब)वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी संकलित मासिक अहवाल दर महिन्याच्या २० तारखेपूर्वी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना मिळेल असा पाठवावा.

(क) जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी जिल्हयाचा संकलित मासिक अहवाल १२ तारखेपर्यत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि कार्यकारी अभियंता पाणी व्यवस्थापन कक्ष यांना द्यावा.

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या मासिक अहवालावरील अभिप्राय वा मार्गदर्शन वा आदेश प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यत मिळतील असे पाठवावे.

(ड) विस्तार अधिकारी (आरोग्य) यांनी ओ.टी. चाचणी, एफ.एफ.सी. चाचणी आणि परिसर स्वच्छता सर्वेक्षणचा ३ मासिक अहवाल वैद्यकीय अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना दर महिन्यात अनुक्रमे ५ तारखेपर्यत व २ तारखेपर्यत मिळेल असा पाठवावा.

(ई) गट विकास अधिकाऱ्यांनी विस्तार अधिका-यांच्या अहवालावरुन योग्य ती कार्यवाही करण्यासाठी ग्रामसेवकास दर महिन्यात ८ तारखेपर्यंत कळवावे.

(फ) पंचायत समिती स्तरावर होणाऱ्या सभेत पाणी गुणवत्ता संनियत्रंणाच्या अहवालांवर गट विकास अधिकाऱ्यांनी वैद्यकीय अधिकारी, विस्तार अधिकारी (आरोग्य) आणि पाणी गुणवत्ता निरीक्षक यांचेबरोबर चर्चा करुन पुढील कार्यवाहीसाठी निर्णय घ्यावेत व लगेच ग्रामसेवकांना कळवावेत.

(ग) वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विस्तार अधिकारी (आरोग्य) यांचा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना १० तारखेच्या पूर्वी मिळेल असा पाठवावा.

(ह) जिल्हयाचा संकलित अहवाल जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी १२ तारखेपर्यत मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कार्यकारी अभियंता (पाणी व्यवस्थापन कक्ष) यांना द्यावा.

(ज) जिल्हा आरोग्य अधिका-यांनी आपले अभिप्राय वा आदेश वा मार्गदर्शन वैद्यकीय अधिकाऱ्यांना १५ तारखेपर्यंत मिळेल असे पाठवावे.

(ल) कार्यकारी अभियंत्यानी या अहवालाच्या परिसर स्वच्छता सर्वेक्षणाच्या बाबतीत जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांशी चर्चा करुन योग्य त्या सूचना पाणी गुणवत्ता निरीक्षकास १५ तारखेपर्यंत मिळतील अशा पाठवाव्यात.

शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापु-१०१४/सीआर-८९६/३९-अ, दिनांक १४ जून १९९४ मधील प्रपत्र अ,ब,क,ड,ई,फ,ग आणि य तसेच तक्ता क्रमांक १ ते ५ हे सदर शासन निर्णयाचे सहपत्र म्हणून विहित करण्यात येत असून ते पूर्वीप्रमाणेच वापरात राहातील.

सदर शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
४. मा. मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
८. सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी.
९. संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई.
११. मुख्य अभियंता (ग्रामीण), महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई.
१२. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१३. सह संचालक, आरोग्य सेवा, सेंट्रल बिल्डिंग,पुणे.
१४. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व).
१५. सर्व परिसर अभियांत्रिकी मंडळाचे अधिक्षक अभियंता.
१६. सर्व गट विकास अधिकारी.
१७. सार्वजनिक आरोग्य विभाग/ग्रामविकास व जलसंधारण विभाग/नियोजन विभाग/वित्त विभाग/ अन्य मंत्रालयीन विभाग.
१८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
१९. निवड नस्ती , पापु-०७.

## परिशिष्ट-१

वैयक्तिक पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीतही गावांतर्गत पाणी पुरवठयाच्या बाबतीत पाणी गुणवत्ता संनियंत्रणाची संपुर्ण जबाबदारी संबंधित ग्राम पंचायतीची राहील. ग्राम पंचायतीला ही जबाबदारी पार पाडणे सुकर व्हावे म्हणून ग्राम पंचायतीला सल्ला देण्यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्यात यावी.

(१) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचना पुढील प्रमाणे असावी :-

(१अ) समितीस कमीतकमी ५ सभासद राहातील, गावाच्या ग्रामपंचायतीचे सरपंच हे समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतील व निवडून आलेल्या स्त्रीपंच प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका/स्त्री शिक्षिका व अंगणवाडी शिक्षिका या पदसिध्द सदस्य असतील आणि ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी, पदसिध्द सदस्य-सचिव राहातील. याशिवाय, खाली निर्देशिल्याप्रमाणे ग्रामस्थांस प्रतिनिधित्व देण्यात यावे.

(अ) गावाच्या प्रत्येक वाडीतीले एक ग्रामस्थ.
(ब) गावातील महिला मंडळाचे दोन प्रतिनिधी.
(क) गावात माध्यमिक शाळा असल्यास, त्या शाळेचे मुख्याध्यापक.
(ड) अनुसूचित जाती/ जमातीची प्रतिनिधी.
(ई) अल्पसंख्याकांचा प्रतिनिधी.
(फ) युवक मंडळाचा एक प्रतिनिधी.
(ग) गट ग्राम पंचायत असल्यास प्रत्येक वाडयातील वा वस्तीतील एक प्रतिनिधी घेणे अनिवार्य आहे.

टीप :- सरपंच, स्त्रीपंच, प्राथमिक शाळेच्या मुख्याधिपिका/ स्त्रीशिक्षिका व अंगणवाडी शिक्षिका ज्या वाडीत रहात असतील त्या वाडयांना वेगळे प्रतिनिधीत्व देण्यात येऊ नये.

(१ब) या समितीच्या सदस्यत्वासाठी (पदसिध्द सदस्य वगळून) किमान वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण व शैक्षणिक पात्रता किमान ४ थी इयत्ता उत्तीर्ण अशी राहील. परंतु अनुसूचित जाती/जमातीच्या ग्रामस्थांस समितीचे सदस्यत्व देता येईल.

(१क) समितीचा कालावधी संबंधित ग्राम पंचायतीच्या सरपंच/सदस्यांच्या कालावधी इतका राहील.

(१ड) समितीच्या सदस्यांची निवड ग्राम सभा करील.

(१ई) समितीत जास्तीत जास्त व शक्य असल्यास ५० टक्क्यापर्यत सदस्य स्त्रिया रहातील.

(१फ) ज्या गावांसाठी ग्राम पंचायती आस्थापित झालेल्या नाहीत, अशा गावांस संबंधित पंचायत समितीचे सल्ल्यांने गट विकास अधिकारी समिती आस्थापित करतील व संबंधित अटीच्या अधीन राहून ग्रामस्थांची सदस्य म्हणून निवड करतील. संबंधित गाव ज्या विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्या कक्षेत असेल ते विस्तार अधिकारी (पंचायत) सदर समितीचे अध्यक्ष रहातील. अशा समित्यांचे अध्यक्ष सर्वानुमते समितीच्या सदस्यांपैकी एका सदस्यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करतील व अध्यक्षांच्या अनुपस्थितीत

उपाध्यक्ष समितीचे अध्यक्ष म्हणून काम करतील. गावाच्या प्राथमिक शाळेतील शिक्षिका नसल्यास, अन्य कोणत्याही सदस्याची समितीचे सचिव म्हणून अध्यक्ष नियुक्ती करतील.

२. ग्राम पाणीपुरवठा व परिसर स्वच्छता समितीचे कार्यक्षेत्र :- समितीच्या कार्यकक्षेत शासनाने ग्राम पंचायतीच्या हद्दीतील गावाचे/गावातील सर्व सार्वजनिक उद्‌भव पाणी पुरवठयासाठी केलेली व्यवस्था व पाणवठे येतील.

३. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची कर्तव्ये :-

**(अ) ग्राम पाणीपुरवठा कर्मचारी :-**

ग्राम पाणीपुरवठा व परिसर स्वच्छता समितीने आपल्या गावातील सुशिक्षित व काम करण्यास उत्सुक असलेल्या व्यक्तीची निवड करुन त्याची ग्राम पाणीपुरवठा कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यासाठी ग्राम पंचायतीकडे शिफारस करावी. या व्यक्तीस योग्य प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने ग्राम पंचायतीस मार्गदर्शन करावे. ग्राम पंचायतीने या व्यक्तीचे मानधन/पगार जमा झालेल्या पाणीपट्टीतून भागवावा. समितीने ग्राम पाणी पुरवठा कर्मचाऱ्याच्या कामाचे पर्यवेक्षन करण्यात ग्राम पंचायतीला मदत करावी व तो आपली कर्तव्ये वेळेवर आणि नीटपणे पार पाडतो आहे किंवा नाही यावर नियंत्रण ठेवण्याबाबत मार्गदर्शन व मदत करावी.

ग्राम पाणीपुरवठा कर्मचाऱ्याची कर्तव्ये खालीलप्रमाणे रहातील :-

(१) गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या उद्‌भवाची नोंद ठेवणे.

(२) गावात नळपाणी पुरवठा असल्यास-

(अ) पाणी वेळेवर सोडणे व सर्व वाडया, वस्त्यांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळेल याची खात्री करणे.

(ब) नळपाणी पुरवठा यंत्रणेत निर्माण झालेल्या किरकोळ बिघाडाची दुरुस्ती करणे.

(क) दररोज ओ.टी. चाचणी घेणे. ओ.टी. साठी पाणी नमुना गावातील प्रत्येक भागातील, वाडया, वस्त्यांतील शेवटच्या नळापासून घ्यावयास सुरुवात करुन पुढील काही नळांच्या पाण्याची ओ.टी.चाचणी करावी व निष्कर्ष नोंदवहीत लिहावे.

(ड) ओ.टी. निगेटिव्ह असल्यास पाणी नमुना घेवून एफ.एफ.सी. चाचणीसाठी पाठवावा, आणि ओ.टी. निगेटिव्ह असल्याची माहिती ग्राम पाणी पुरवठा समिती व पाणी पुरवठयाची निगा राखणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यास द्यावी.

(३)गावास पाणी पुरवठा विहिरी व हातपंपाचा असल्यास -

(अ) सर्व पिण्याच्या पाण्याच्या विहिरीच्या पाण्यात टी.सी.एल. योग्य प्रमाणात व योग्य पध्दतीचा अवलंब करुन टाकावे.

(ब) पिण्याच्या पाण्याच्या सर्व विहिरींच्या पाण्याची ओ.टी. चाचणी दररोज घ्यावी व निष्कर्षाची नोंद नोंदवहीत घ्यावी.

(क) ओ.टी. निगेटिव्ह असल्यास पाणी नमुना घेवून एफ.एफ.सी. चाचणीसाठी पाठवावा व त्यांची नोंद नोंदवहीत घ्यावी. त्यानंतर लगेचच त्या विहिरीत टी.सी.एल. टाकून पाणी निर्जतूक करावे.

(४)पिण्याच्या पाण्याच्या सर्वच उद्‌भवा भोवतालचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी.

(५)पाणी पट्टी वसूलीस ग्रामसेवकास मदत करावी.

(६)त्याने केलेल्या कामाची माहिती वेळोवेळी ग्रामसेवक व ग्राम पंचायतीस घ्यावी.

(७)प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाचा मासिक अहवाल विहित नमुन्यात ग्रामसेवकास द्यावा.

**(ड) सार्वजनिक विहिरी :-**

सार्वजनिक विहिरीच्या बाबतीत समितीने खाली निर्देशिलेल्या बाबीबाबत दक्षता घेण्याबाबत ग्रामपंचायतीस मार्गदर्शन व मदत करावी.

(१) सार्वजनिक विहिरीतील गाळ दोन वर्षातून किमान एकदा तरी उपसण्यात येतो.

(२) सार्वजनिक विहिरीत पोहावयास अथवा अन्य कारणांसाठी कोणीही व्यक्ती उतरुन पाणी घाण / अशुध्द केले जात नाही.

(३) सार्वजनिक विहिरींच्या परिसरात कपडे धुणे, भांडी घासणे, आंघोळ करणे, जनावरे धुणे, मलमुत्र विसर्जन, इत्यादी आक्षेपाई व्यवहार केला जात नाही. तसेच विहिरीवर झाडाच्या फांदया आल्यामुळे विहिरीत पालापाचोळा अथवा पक्ष्यांची विष्ठा पडत नाही.

(४)खताचे खड्डे / सार्वजनिक -खाजगी संडास, सार्वजनिक विहिरींच्या लगतच्या परिसरात अस्तित्वात नाहीत.

(५)सार्वजनिक विहिरींच्या पडझड झाल्यास ती पूर्ववत सुस्थितीत रहाण्याच्या दृष्टीने ग्राम पंचायतीमार्फत कार्यवाही करण्यांत येते.

**(ई) हातपंप/वीजपंप :-**

विंधण विहिरीवर बसविण्यात आलेल्या हातपंप/विद्युतपंपाबाबत समितीने खाली निर्देशिलेल्या बाबीबाबत दक्षता घेण्यासाठी ग्रामपंचायतीस मार्गदर्शन व मदत करावी.

(१) हातापंपाच्या दांड्याशी अथवा वीजपंपाच्या नळ कोंडयाळयाशी गावातील मुले खेळून त्याची मोडतोड होत नाही.

(२) विंधन विहिरीतील पाण्याचा उपसा मोठया प्रमाणावर पिण्या व्यतिरिक्त अन्य कारणांसाठी करण्यात येत नाही.

(३) विंधण विहिरींसाठी बांधण्यात आलेल्या ओटयांवर कपडे धुतले जात नाहीत. तसेच, सदर ओटे/फुटलेल्या स्थितीत नाहीत.

(४)विंधन विहिरीच्या आजूबाजूस साठणाऱ्या पाण्यास वाट काढून ते दूरवर सोडून देण्यात येते, ते परिसरात साचून मुरत नाही. तसेच, विंधण विहिरींच्या परिसरात खताचे खड्डे /सार्वजनिक अथवा खासगी संडास नाहीत.

(५) हातपंप/वीजपंप नादुरुस्त झाल्यास, त्यांची वेळच्यावेळी दुरुस्ती केली जात आहे.

(६) हातपंप/वीजपंपासाठी विहित केलेली वर्गणी ग्राम पंचायतीमार्फत प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्यात १५ तारखेपर्यत जिल्हा परिषदेकडे भरली जात आहे.

**(४) नळ योजना :-**

नळ योजना ही पाणी पुरवठयासाठी कार्यान्वित करण्यात आलेली अत्यंत महागडी व खर्चिक उपाययोजना आहे, हे लक्षात घेऊन समितीने या उपाययोजनेच्या बाबतीत काळजीपूर्वक खाली निर्देशिल्याप्रमाणे दक्षता घेण्यासाठी ग्रामपंचायतीस मागदर्शन व मदत करावी.

(१) गावातील उंचावरील टाकी व जमिनीवरील टाकीची जागा तसेच, गावात बसविण्यात येणाऱ्या नळकोंडाळाची जागा नळ योजनेच्या संबंधीत अभियंत्याच्या मदतीने / मार्गदर्शन ग्रामस्थांची सोय होईल अशा रितीने निश्चित करावी.

(२) गावांतील नळयोजनेच्या वितरण नलिका विहिर खोलीवर व गावातील सांडपाण्याच्या गटारापासून सुरक्षित अंतरावर टाकण्यात येत आहेत.

(३) उद्‌भवापासून गावापर्यंत पाणी आणण्यासाठी टाकण्यात आलेल्या उध्दरण वाहिनी / गुरुत्व वाहिनीची अथवा तीवर बसविण्यात आलेल्या एअर व्हॉल्व्हची विघ्नसंतोषी लोकांकडून तोडफोड केली जात नाही व अशी तोड-फोड निदर्शनास आल्यास, वेळच्या वेळी दुरुस्ती केली जात आहे.

(४) उध्दरण वाहिनी/गुरुत्व वाहिनी, उंचावरील टाकी/ जमिनीवरील टाकी व वितरण नलिकात गळती आढळल्यास, ती वेळीच दुरुस्त केली जात आहे.

(५) नळांची मोडतोड करण्यात येत नाही, अथवा मोडतोड झाल्यास, ते वेळच्यावेळी दुरुस्त करण्यात येत आहेत.

(६) नळातून पाणी वाहून ते फुकट जात नाही अथवा नळ कोंडाळयच्या परिसरात साचून राहत नाही, ज्यामुळे गावात डास, माशा इत्यादीचा उपद्रव वाढून साथरोगांचा प्रादूर्भाव होणार नाही.

(७) नळांच्या पाण्याच्या बागा शिंपणे, जनावरे धुणे इत्यादी प्रकारे गैरवापर करण्यात येत नाही.

(८) योजनेच्या उद्‌भवाजवळ अथवा नळ कोंडाळयाच्या परिसरात कपडे धुणे, भांडी घासणे, जनावरे धुणे, मलमुत्र विसर्जन इत्यादी आक्षेपाई व्यवहार केले जात नाहीत व परिसर स्वच्छ ठेवण्यात येत आहे.

(९) खताचे खड्डे, सार्वजनिक तथा खाजगी संडास योजनेच्या उद्‌भव व नळ कोंडाळयापासून दूर आहेत.

(१०) नळ योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी योग्य दराने पाणीपट्टी बसविण्यात आली आहे व ती वेळच्यावेळी वसुल करण्यात येते.

(५)आदिवासी व दुर्गम भागात पाडयातील वा वाडीतील पाण्याचे निर्जुंतुकीकरण करण्यास कोणीही जबाबदार व्यक्ती उपलब्ध नसल्यास ग्राम पाणी समितीमध्ये त्या भागातील जी व्यक्ती प्रतिनिधी म्हणून घेण्यात आली आहे त्या व्यक्तीने ग्राम पाणी व्यक्तीचे सर्व कर्तव्ये पार पाडावी. अशा भागात ग्राम पाणी समिती अस्तित्वात नसल्यास ग्रामसेवकांनी ही जबाबदारी त्या पाडयातील वा वाडीतील एक किंवा दोन जबाबदार कुटूंबावर सोपवावी.

(६) ज्या गावामध्ये ग्राम पाणी पुरवठा कर्मचारी नियुक्त झालेला नाही अशा गावात ग्राम पाणी पुरवठा कर्मचाऱ्याची नियुक्ती होईपर्यत ग्रामसेवकांनी ग्रामपंचायतीच्या शिपायाकडून ग्राम पाणी पुरवठया कर्मचाऱ्याची कामे करुन घ्यावीत.

(७) ज्या भागामध्ये पिण्याच्या पाण्याचे उद्‌भव निश्चित नाही अशा ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी घरोघर क्लोरीन गोळया किंवा द्रव क्लोरीन पुरविण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची राहील.

**(८) पाणी पुरवठा योजनेचे आर्थिक व्यवस्थापन :-**

शासनाचा असा अनुभव आहे की ग्रामपंचायती ग्रामस्थांकडून वेळच्यावेळी पाणीपट्टी वसूल करत नाहीत. शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की पाणीपट्टीद्वारा प्राप्त झालेला पैसा बहुतेक वेळा इतर कामासाठी वापरला जातो.

(१) गावातील अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी ग्राम पंचायतीची असून निधी अभावी पाणी वितरण व्यवस्था कोलमडू नये म्हणून पाणीपट्टीद्वारे जमा झालेला निधी जमा करण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांच्या मदतीने एक स्वतंत्र खाते बँकेत उघडावे.

(२) प्रादेशिक पाणी पुरवठयाच्या बाबतीत जमा झालेल्या पाणीपट्टी निधीपैकी ८०% भाग हा जिल्हा परिषदेच्या देखभाल व दुरुस्ती निधीत ड्राफ्ट वा चेकद्वारे भरावा. उर्वरित २०% रक्कम ग्राम पाणीपट्टी निधीच्या खात्यावर जमा करावे. वैयक्तिक नळयोजनेच्या बाबतीत ग्रामपंचायतीने जमा झालेल्या निधीच्या २०% निधी जिल्हा परिषदेच्या निधीत जमा करावा.

(३) पाणी पट्टीची वसूली १००% होईल याची काळजी ग्रामपंचायतीने घ्यावी व जमा झालेला निधी हा पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठीच खर्च केला जाईल याची काळजी घ्यावी.

(४)ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने पाणी पुरवठा, देखभाल व दुरुस्ती साठीचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे व ते पंचायत समितीला (गटविकास अधिकारी ) सादर करणे या कामी ग्रामपंचायतीस मार्गदर्शन व मदत करावी.

(५) पाणी समितीचे सचिव या नात्याने ग्रामसेवकांनी पाणीपट्टीचे स्वतंत्र हिशेब ठेवावेत व पाणी समितीच्या मासिक सभेत तसेच ग्रामपंचायतीच्या सभेत मासिक खर्चाचा अहवाल वाचून दाखवावा.

(६) जमा होत असलेल्या पाणी पट्टीत पाणी योजना राबवणे शक्य नसल्यास ग्राम पंचायतीने जादा निधीची मागणी पंचायत समितीला व जिल्हा परिषदेकडे करावी. आणि सदरील संस्थांनी मागणी योग्य आहे किंवा काय याची पडताळणी करुन योग्य वाटल्यास निधी उपलब्ध करुन द्यावा.

(७)मुळ पाणी पुरवठा योजना अंतर्गत समाविष्ठ असलेल्या गावामध्ये नळकोंडयातून पाणी घेणाऱ्या कुटूंबासाठी तसेच वैयक्तीक नळधारक कुटूंबाकडून शासनाने विहीत केलेल्या पाणी पट्टीच्या किमान व कमाल दरास अधिन राहून पाणी पट्टी आकारण्यात यावी व वसूल करावी.

परिशिष्ट -२

अंतर्गत विविध चाचण्या करण्याची वारंवारता

पाणी गुणवत्ता नियंत्रण

| अनुक्रमांक | उद्भव व पाणी पुरवठा करण्याचा प्रकार | पाणी नमुने गोळा करणे/तपासणे | | | | रासायनिक चाचणी व परिसर स्वच्छता सर्वेक्षण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाणी पुरवठा कर्मचारी | | कनिष्ठ अभियंता (सि.व.पा.पु) | | भुजल सर्वेक्षण यंत्रणा | | उपअभियंता (सि.व.पा.पु) | |
| | | वारंवारता | चाचणी | वारंवारता | चाचणी | वारंवारता | चाचणी | वारंवारता | चाचणी |
| १-अ | साधी विहिर | दररोज<br>१५ दिवसातून एकदा | १) ओटी टेस्ट<br>२) परिसर स्वच्छता सर्वेक्षण | दोन महिन्या तून एकदा | ओटी टेस्ट, रासायनिक चाचणी | | | चार महिन्यातून एकदा | ओटी रासायनिक चाचणी |
| १-ब | साधी विहिर जेव्हा जेव्हा ओटी टेस्ट निगेटिव्ह येईल तेव्हा | | एफ.एफ.सी. | दोन महिन्या तून एकदा | परिसर स्वच्छता सर्व्हेक्षण | | | चार महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण |
| २-अ | विंधन विहिर | दररोज<br>महिन्यातून एकदा | १)ओटी टेस्ट<br>२) परिसर स्वच्छता सर्वेक्षण | | | महिन्यातून एकदा | ओटी टेस्ट रासायनिक चाचणी | | |
| २-ब | विंधन विहिर जेव्हा जेव्हा ओटी टेस्ट निगेटिव्ह येईल तेव्हा | | एफ.एफ.सी. | | | दोन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | | |
| ३-अ | विंधन विहिर वरुन नळ पाणी पुरवठा योजना | दररोज<br>महिन्यातून एकदा | १)ओटी टेस्ट<br>२) परिसर स्वच्छता सर्वेक्षण | | | महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | | |
| ३-ब | विंधन विहिर वरुन नळ पाणी पुरवठा योजना | जेव्हा जेव्हा ओटी टेस्ट निगेटिव्ह येईल तेव्हा | एफ.एफ.सी. | | | दोन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | | |
| ४ | भूपृष्ठावरील पाण्यावरुन केलेली नळपाणी पुरवठा योजना | दररोज<br>जेव्हा ओटी टेस्ट निगेटिव्ह येईल तेव्हा<br>महिन्यातून एकदा | ओटी टेस्ट<br>एफएफसी टेस्ट<br>परिसर स्वच्छता सर्वेक्षण | दोन महिन्या एकदा<br>दोन महिन्यातून एकदा | ओटी टेस्ट, रासायनिक चाचणी<br>परिसर स्वच्छता सर्वेक्षण | | | चार महिन्यातून एकदा<br>चार महिन्यातून एकदा | ओटी टेस्ट रासायनिक चाचणी<br>परिसर स्वच्छता सर्वेक्षण |

परिशिष्ट क्रमांक - २

पाणी गुणवत्ता सर्वेक्षण अंतर्गत विविध चाचण्या करण्याची वारंवारता

| अनुक्रमांक | उद्भव व पाणी पुरवठा करण्याचा प्रकार | पाणी नमुने गोळा करणे /तपासणे | | | | वैद्यकीय अधिकारी | | अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बहुउद्देशिय कर्मचारी | | तालुका विस्तार अधिकारी (आरोग्य) | | | | | |
| | | चाचणी | वारवारता | चाचणी | वारंवारता | चाचणी | वारवारता | चाचणी | वारवारता |
| १. | साधी विहिर | ओटी टेस्ट | दोन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | दोन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | तीन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | चार महिन्यातून एकदा |
| | | एफएफसी टेस्ट | जेव्हा जेव्हा ओटी टेस्ट निगेटिव्ह येईल तेव्हा | | | | | | |
| २. | विंधण विहिर | ओटी टेस्ट | दोन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | दोन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | तीन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | चार महिन्यातून एकदा |
| | | एफएफसी टेस्ट | जेव्हा जेव्हा ओटी टेस्ट निगेटिव्ह येईल तेव्हा | | | | | | |
| ३. | विंधण विहिरवरुन नळ पाणी पुरवठा योजना | ओटी टेस्ट | महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | दोन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | तीन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | चार महिन्यातून एकदा |
| | | एफएफसी टेस्ट | जेव्हा जेव्हा ओटी टेस्ट निगेटिव्ह येईल तेव्हा | | | | | | |
| ४. | भूपृष्ठावरुन नळ पाणी पुरवठा योजना | ओटी टेस्ट | महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | दोन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | तीन महिन्यातून एकदा | परिसर स्वच्छता सर्वेक्षण | चार महिन्यातून एकदा |
| | | एफएफसी टेस्ट | जेव्हा जेव्हा ओटी टेस्ट निगेटिव्ह येईल तेव्हा | | | | | | |

**प्रपत्र-अ** (हिरव्या रंगाचे प्रमाणपत्र)

(वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी सुरक्षित पिण्याच्या पाण्याबाबत द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना)

**प्र मा ण प त्र** (क्रमांक १/२)

जिल्हा: तालुका :
गाव/वाडी: जनगणना क्रं.

श्री. -------------------------------- वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र ------------------------- तालुका ---------------------------- जिल्हा -------------------------- प्रमाणित करतो की, गावातील/वाडयातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत सुरक्षीत असून ते सुरक्षित ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे पूर्वतयारी/कार्यवाही करण्यात आली आहे.

१. पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीचा (टिसीएल पावडर, द्रव क्लोरीन, क्लोरीन गोळया इत्यादी) पुरवठा ग्राम पंचायतीकडे उपलब्ध आहे.

२. पाणी शुध्दीकरण सामुग्रीचा साठा प्रमाणित असल्याची पडताळणी ग्राम पंचायतीने केली आहे.

३. पाणी शुध्दीकरणाची कार्यवाही करण्यासाठी जबाबदार कर्मचाऱ्या/व्यक्तीची निवड/नियुक्ती ग्राम पंचायतीने केली आहे.

४. नळ पाणी पुरवठा योजनेच्या ----------------------------- ठिकाणी पाणी शुध्दीकरणाची उचित व्यवस्था करण्यात आली आहे. नळांमधील गळत्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

५. विहिरीच्या कठडयांची व परिसराची आवश्यक तेथे दुरुस्ती करण्यात आली आहे.

६. हातपंप, बोअरवेल इत्यादी पाणी पुरवठयाची साधने व परिसर सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था सक्षम यंत्रणेने केली आहे.

७. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत असुरक्षितच राहणार आहेत. अशा ठिकाणी ते स्त्रोत पिण्याच्या पाण्यासाठी असुरक्षित असल्याचे फलक लावण्यात आले आहेत.

८. अन्य महत्वाची बाब.

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मते महत्वाच्या असणारा इतर कोणताही तपशील, उदा. पाण्याचे नमुने.

टिप :- सदर प्रमाणपत्र क्रमांक १ चे स्वरुपात ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत सर्व्हेक्षणाचे आधारे तर क्रमांक २ चे स्वरुपात मे, जून महिन्यात फेर सर्व्हेक्षणाअंती द्यावयाचे आहे.

**प्रपत्र-ब** (लाल रंगाचे प्रमाणपत्र)

(वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी असुरक्षित पाणी पुरवठयाबाबत द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना)

**प्र मा ण प त्र** (क्रमांक १/२)

जिल्हा: तालुका :
गाव/वाडी: जनगणना क्रं.

श्री. -------------------------------- वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र ------------------------ तालुका ---------------------------- जिल्हा -------------------------- प्रमाणित करतो की, ----------------- या गावातील/वाडयातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत सुरक्षीत नाहीत. हे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक असलेली व खाली नमूद करण्यात आलेली पूर्वतयारी/कार्यवाही करण्यात आलेली नाही.

१. पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीचा (टिसीएल पावडर, द्रव क्लोरीन, क्लोरीन गोळया, इत्यादी) पुरवठा ग्राम पंचायतीकडे उपलब्ध नाही.

२. पाणी शुध्दीकरण सामुग्रीचा साठा प्रमाणित असल्याची पडताळणी ग्राम पंचायतीने केलेली नाही.

३. पाणी शुध्दीकरणाची कार्यवाही करण्यासाठी जबाबदार कर्मचाऱ्या/व्यक्तीची निवड/नियुक्ती ग्राम पंचायतीने केलेली नाही.

४. नळ पाणी योजनेच्या ----------------------------- ठिकाणी पाणी शुध्दीकरणाची उचित व्यवस्था करण्यात आलेली नाही. नळातील गळत्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

५. सोबत जोडलेल्या यादीनुसार विहिरींच्या कठडयांची व परिसराची आवश्यक दुरुस्ती सक्षम यंत्रणेने केलेली नाही.

६. हातपंप, बोअरवेल इत्यादी पाणी पुरवठयाची साधने व परिसर सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था, सक्षम यंत्रणेने केले ली नाही.

७. ज्या पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत असुरक्षितच राहणार आहेत. अशा ठिकाणी ते स्त्रोत पिण्याच्या पाण्यासाठी असुरक्षित असल्याचे फलक लावण्यात आलेले नाहीत.

८. अन्य महत्वाची बाब.

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मते महत्वाच्या असणारा इतर कोणताही तपशील, उदा. पाण्याचे नमुने.

टिप :- सदर प्रमाणपत्र क्रमांक १ चे स्वरुपात ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत सर्व्हेक्षणाचे आधारे तर क्रमांक २ चे स्वरुपात मे, जून महिन्यात फेर सर्व्हेक्षणाअंती द्यावयाचे आहे.

## प्रपत्र-"क"

पाणी पुरवठा साठयाचे शुध्दीकरणासाठी लागणाऱ्या टी.सी.एल. ची गरज

| अ.क्रं. | पाणी साठा प्रकार | टी.सी.एल. गरज | |
|---|---|---|---|
| १. | विंधन विहिर | प्रत्येक विंधन विहिरीस ३०० ग्रॅम | सहा महिन्यातून एक वेळ |
| २. | सार्वजनिक विहिर | १००० लिटर पाण्यात ५ ग्रॅमप्रमाणे | दैनंदिन पाणी साठा<br>लिटर मध्ये x ५ ग्रॅम =<br>―――――――――<br>१००० एका विहिरीसाठी दैनंदिन |
| ३. | नळ पाणी पुरवठा | टाकीची क्षमता | -"- ग्रॅम एका वेळेस शुध्दीकरणासाठी |

वरील सुत्राचा वापर करुन एकूण विहिरींच्या/पाणी साठयांच्या संख्येनुसार मासिक/वार्षिक गरज काढण्यात यावी.

**प्रपत्र-"ड"-१**

जिल्हा :- पंचायत समिती :-

| अ.क्रं. | ग्राम पंचायतीचे नांव | संपूर्ण आर्थिक वर्षात किती टी.सी.एल. पावडरची गरज आहे. | स्तंभ क्रं. ३ प्रमाणे टी.सी.एल. पावडर खरेदीवरील अंदाजित खर्च. | स्तंभ क्रं.४ मधील खर्च भागविण्यासाठी ग्राम पंचायत किती कमाल तरतूद करु शकेल. | टी.सी.एल. पावडर खरेदीसाठी उर्वरित आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

**प्रपत्र-"ड"-२**

| अ.क्रं. | पंचायत समिती कार्यक्षेत्रात एकुण ग्राम पंचायतीची संख्या | या सर्व ग्रा. पं. ची संपूर्ण आर्थिक वर्षात आवश्यक टी.सी.एल. पावडरचे प्रमाण व अंदाजित किमंत | | पंचायत समिती क्षेत्रातील सर्व ग्रा . पं. कडून सदर टी.सी.एल. पावडरसाठी उपलब्ध होणारा निधी | पं.स.स्तरावर पंचायत समितीच्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून सदर टी.सी.एल. पावडरसाठी उपलब्ध होणारा निधी. | या प्रमाणे टी.सी.एल. पावडर खरेदी करण्यासाठी जि.प. स्तरावर अपक्षित निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रमाण | किमंत | | | |
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |

३५

६५

## प्रपत्र-"इ"

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांच्या सभेत पाणी शुध्दीकरणासंबंधी घ्यावयाच्या आढाव्याचा तक्ता.

जिल्हा :- महिना:- वर्ष :-

| अ.क्रं. | तालुक्याचे नांव | एकूण गावांची संख्या | दैनंदिन टी.सी.एल. वापराची पध्दत चालू आहे/नाही. | पाणी नमुने दूषित आढळलेल्या गावांची संख्या | टी.सी.एल. उपलब्ध नसलेल्या गावांची संख्या | साथ सुरु झालेली गांवे | साथ झाली असल्यास साथीचे शोधून काढलेले कारण | दोषी आढळल्यानंतर केलेली कारवाई. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

## प्रपत्र-"फ"

### पाणी पुरवठा - पाणी शुध्दीकरण नोंदवही

गांवाचे नांव :-

जोखीमग्रस्त आहे/नाही

लोकसंख्या :-

पाणी शुध्दीकरण करणाऱ्या कर्मचाऱ्याचे नांव :-

सरपंचाचे नांव :-

ग्रामसेवकाचे नांव :-

प्रशिक्षणाचा दिनांक :-

---

नोंद वहीत खालील तक्त्यामध्ये माहिती ठेवावी

### तक्ता क्रं.१

गावातील पाणी पुरवठा साधनांची माहिती :

| अ.क्रं. | पाणी पुरवठा सोयीचा प्रकार (स्थानिक नावानुसार) | संख्या एकूण | संख्या वापरात | संख्या बंद |
|---|---|---|---|---|
| १. | विंधन विहिरी | | | |
| २. | हातपंप | | | |

३. सार्वजनिक विहिरी — मोजमापे (मिटरमध्ये) (विहिरीचा व्यास) — पाण्याची खोली

१)
२)
३)
४)

४. नळपाणी पुरवठा योजना — टाकीची (    ) क्षमता (लिटर्स) — व्हॉल्व संख्या — स्टँड पोस्ट संख्या — घरगुती नळ कनेक्शन संख्या

५. नियमित पाणी पुरवठा साधने काही कारणाने बंद असल्यास

६. पर्यायी पाणी पुरवठयाच्या सोयी (विहिरी, ओढे, टॅकर इ. चा उल्लेख करावा)

१)
२)
३)

## प्रपत्र-"ग"

### तक्ता क्रं.१

### टी.सी.एल. साठा व गुणवत्ता नियंत्रण

| अ.क्रं. | पुरवठा करणाऱ्याचे नांव (पं.स./जि.प.) | दिनांक | पुरवठा कि.ग्रॅ. | उत्पादकाचे नांव उत्पादनाची तारीख बॅच क्रं. क्लोरीनचे प्रमाण | नमुना प्रयोग शाळेत पाठविण्याची तारीख | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|

कार्यवाही

### तक्ता क्रं.२

### टी.सी.एल. साठा दैनंदिन वापर नोंद

| अ.क्रं. | तारीख | पाणी साठा प्रकार | एकूण पाणी (लिटर) | वापरलेली टि.सी.एल. | शिल्लक साठा | ओ.टी. टेस्ट | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|

# प्रपत्र-"य"

## पाणी नमुने तपासणी अहवाल

| अ.क्रं. | पाणी साठा प्रकार | पाणी नमुना घेतल्याची तारीख | अहवाल प्राप्त झाल्याची तारीख व निष्कर्ष | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | | | | |

* आठवडयातून एक पाणी नमुना प्रत्येक पाणी साठा उद्‌भवातून पाठवावा.

साथीची माहिती देणे ग्रामपंचायतीचे वैधानिक कर्तव्य आहे.

(हे पत्र वैद्यकीय अधिकाऱ्यास समक्ष द्यावे व पोहोच घ्यावी.)

प्रति,
वैद्यकीय अधिकारी,
प्रा.आ.केंद्र ---------------------------------

मौजे ------------------------------------ येथे तारीख ------------------------- पासून उलटी-जुलाब/ताप/काविळ साथ सुरु झाली असून एकूण -------------------------------- लागण ---------------------------- मृत्यू झाले आहेत. ताबडतोब औषधोपचाराची सोय करावी.

आपला,

दिनांक :-

सरपंच/ग्रामसेवक

१) विनाविलंब साथीची माहिती देण्यामुळे सत्वर औषेधोपचार करुन मृत्यू टाळता येतात.

२) त्रास होता उलटी/जुलाबाचा,
करा उपचार क्षार संजीवनीचा.

३) शुध्द पाणी हेचं जीवन,
यास्तव करा त्याचे सेवन

४) जेवणापूर्वी धुवा हात,
जेवणानंतर धुवा दात.

प्रति,



९००

## तक्ता क्रमांक १

### साथीची सर्वसाधारण माहिती

१) साथीच्या रोगाचे नांव :-

२) साथ लागणग्रस्त गावाचे नांव व लोकसंख्या :-

३) तालुक्याचे व जिल्हयाचे नांव :-

४) प्रा. आ. केंद्राचे नांव :-

५) प्रथम लागण दिनांक :-

६) वैद्यकीय अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर साथीची माहिती कळविल्याचा दिनांक :-

७) साथीची माहिती उशिरा कळविल्यास त्याची कारणे. :-

८) साथीची उशिरा माहिती कळविल्याबद्दल जि.आ.अ./मु.का.अ. यांनी केलेली कार्यवाही :-

९) साथ समाप्तीपर्यंत एकूण लागण मृत्यू :-

१०) साथ समाप्त झाल्याची तारीख :-

११) वयोगटानुसार व लिंगानुसार एकूण लागण मृत्यू :-

| अ.क्रं. | वयोगट | पुरूष | | स्त्री | |
|---|---|---|---|---|---|
| | | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू |
| १) | ० ते १ वर्ष | | | | |
| २) | २ ते ५ वर्षे | | | | |
| ३) | ६ ते १४ वर्षे | | | | |
| ४) | १५ ते ४४ वर्षे | | | | |
| एकूण | | | | | |

१२) लागणग्रस्त गावामध्ये आरोग्य रक्षक आहे किंवा काय असल्यास एकूण :-

१३) लागणग्रस्त गावात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मुख्यालय :-

१४) त्यांच्या मुख्यालयापासून लागणग्रस्त गावाचे अंतर :-

१५) संबंधित कर्मचारी मुख्यालयात राहतो किंवा नाही :-

१६) लागणग्रस्त भागातील आरोग्य पर्यवेक्षकाचे काम करणाऱ्या मुख्यालयाचे नांव :-

१७) आरोग्य पर्यवेक्षक मुख्यालयात राहतात किंवा नाही. :-

१८) आरोग्य पर्यवेक्षकाच्या मुख्यालयापासून लागणग्रस्त गावाचे अंतर :-

१९) लागणग्रस्त गावापासून प्राथमिक आरोग्य केंद्राचे अंतर :-

२०) उपकेंद्रात एकूण किती कर्मचारी काम करतात त्याची वर्गवारी व नावे. :-

२१) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या व नांवे :-

२२) उद्रेक स्वरुपात साथ उद्‌भवणाच्या अगोदर ३ महिने लागणग्रस्त गावास अधिकारी व कर्मचारी यांच्या भेटीचा तपशिल व तारखा :-

अ) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक :-

ब) सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी निवासी वैद्यकीय अधिकारी किंवा मुख्यालयातील साथरोग पथक वैद्यकीय अधिकारी :-

क) वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र :-

ड) पर्यवेक्षक :-

इ) बहुउद्देशिय कर्मचारी :-

फ) इतर कर्मचारी (संवर्ग लिहावा) :-

२३) लागणग्रस्त गावामध्ये साथीच्या रोगाची प्रतिबंधक लसटोचणी केली होती किंवा काय ? :-

२४) लागणग्रस्त गावातील पिण्याची पाणी पुरवठा व्यवस्था आणि त्याची पुरवठानिहाय संख्या :-

अ) नदी :-

ब) तलाव / तळे :-

क) ओढा/झरा :-

ड) विहिर - १) खाजगी :-

२) सार्वजनिक :-

इ) कूपनलिका - १) बोअरवेल (हातपंप) :-

२) विद्युतपंप :-

फ) नळ योजना- १) कायमस्वरुपी :-

२) तात्पुरती :-

२५) उद्रेक स्वरुपात साथ सुरु होण्याअगोदर ३ महिन्याच्या कालावधीत त्या गावातील घेतलेले नमुने याची आकडेवारी व प्रयोग शाळेचा अहवाल :-

| अ.क्रं. | महिना | घेतलेले नमुने | तपासणी अहवालातील निष्कर्ष | |
|---|---|---|---|---|
| | | पाणी | योग्य | पाणी |
| | | | योग्य | अयोग्य |

२६) दुषित नमुने आढळल्यास करण्यात आलेली कार्यवाही (सत्यप्रत जोडावी) :-

२७) लागणग्रस्त गावातील ग्रामपंचायतीस उपलब्ध असलेल्या ब्लिचिंग पावडरच्या साठयाची माहिती :-

| अ.क्रं. | महिना | एकूण ब्लिचिंग पावडर |
|---|---|---|
| | | |

२८) ब्लिचिंग पावडर उपलब्ध नसल्यास साठा उपलब्ध करुन घेण्यासाठी केलेली कार्यवाही :-

२९) अ) ग्रामपंचायतीने :-
ब) पंचायत समितीने :-
क) जिल्हा आरोग्य अधिकारी :-
लागणग्रस्त गावात साथ होण्याअगोदर उद्रेक स्वरुपात साथ झाली होती काय ? :-

अ) उद्रेक स्वरुपात झालेल्या साथीचे नांव ? :-
ब) साथ झाल्याची तारीख व समाप्तीची तारीख :-
क) साथीमध्ये झालेले एकूण लागण मृत्यू :-

३०) संबंधित प्रा.आ.केंद्रात/ /नं.द. येथे औषधांचा साठा पुरेशा प्रमाणात होतो किंवा काय ? :-

३१) साथ संदर्भात आवश्यक साठा किती उपलब्ध होता त्याची सविस्तर माहिती. :-

## तक्ता क्रमांक २

(अ) साथीच्या काळातील माहिती

गावाचे नांव :- तालुका:- जिल्हा:- साथरोगाचे नांव:- गावाची लोकसंख्या:-

प्राथमिक आरोग्य केंद्र :-

| अ.क्रं. | लागण दिनांक | एकूण मृत्यू | लागण | माहिती कळविली | कोणी | कोणाला कळविली | कळविल्याचा दिनांक | कशाने कळविला | भेटीचा दिनांक वै.अ. | भेटीचा दिनांक जि.आ.अ. | लागणीचे संभाव्य कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

ब) साथीच्या काळातील पाणी/शौच/रक्त नमुने इतर तपासणीची माहिती

१) लागणग्रस्त गावातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा योजना :-

| अ.क्रं. | दिनांक | तपासणीसाठी घेतलेले नमुने संख्या | | | | दूषित आढळलेले नमुने संख्या | | | | दुषित पाणी पुरवठा शुध्द केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाणी | शौच | रक्त | इतर | पाणी | शौच | रक्त | इतर | |

क) साथीच्या काळातील सर्वेक्षणाची माहिती

| अ.क्रं. | लागणग्रस्त गावात करण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा दिनांक | सर्वेक्षणात आढळून आलेल्या रुग्णांची संख्या | संबंधित रोग्याच्या घरातील किती लोकांना उपचार केले उपचार केलेली संख्या व दिनांक | उपचाराचा तपशील | किती घरे निर्जुंतुक केली व कशाने दिनांकासह | आरोग्य शिक्षण तपशील |
|---|---|---|---|---|---|---|

ड) साथीच्या काळात रुग्णावर उपचारांसाठी उघडण्यात आलेल्या कक्षाची माहिती

| विविक्षित कक्ष | | तज्ञ पथकाच्या भेटीचे दिनांक | | | |
|---|---|---|---|---|---|
| आंतररुग्ण संख्या | बाहय रुग्ण संख्या | सामान्य रुग्णालय | वैद्यकीय महाविद्यालय | राष्ट्रीय विषाणू संख्या | इतर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

८५

९०५

लागणग्रस्त गावातील रुग्णांची संख्या माहिती

लागण झाल्याची तारीख :-

| अ.क्रं. | नांव | वय | लिंग | लागण तारीख | बरे झाल्याची तारीख | मृत्यूची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

टीप :- मृत्यू झाला असल्यास, प्रत्येक मयताचा मृत्यू संशोधन फॉर्म भरुन तो या अहवालासोबत पाठवावा.

**तक्ता क्र ३**

**पाणी पुरवठा योजना**

| | | |
|---|---|---|
| १. | गावाचे नांव | :- |
| २. | लोकसंख्या | :- |
| ३. | पाणी पुरवठा योजनेचे स्वरुप विहिर/हातपंप/तात्पुरती/ नळ योजना कायमस्वरुपी नळ योजना. | :- |
| ४. | ग्रामपंचायत | :- |
| ५. | नळ योजना ज्यांच्या ताब्यात आहे त्यांचे पूर्ण नांव / पत्ता व फोन नंबर (ऑफिस/घर) | :- |
| ६. | सरपंच यांचे पूर्ण नाव पत्ता | :- |
| ७. | ग्रामसेवक यांचे संपूर्ण नांव, पत्ता | :- |
| ८. | नळ योजनेची जुनी/नवी पाईप लाईन केव्हा सुरु झाली दिनांक | :- |
| ९. | सध्या कोणच्या मालकीची पाणी पुरवठा योजना आहे | :- |
| १०. | नळ योजना तयार करीत असताना त्यात काही दोष आहे काय ? | :- |
| ११. | सेंटलिंग टॅक, सेंटीपेंटल टॅक, फिलेट्रेशन टॅक, क्लोरेनेशन टॅक यांची व्यवस्था आहे काय ? | :- |
| १२. | तुरटी, टीसीएल, साठा भरपूर आहे काय ? किती साठा आहे, लिहावे. | :- |
| १३. | पाणी शुध्दीकरण करणाऱ्या जबाबदार व्यक्तीचे नांव | :- |
| १४. | टी.सी.एल. व तुरटी तपासणी अहवालाच्या प्रती | :- |
| १५. | पाण्याच्या साठयाच्या टाकीची क्षमता | :- |
| १६. | मागील सहा महिन्यात पाणी पुरवठा योजनानिहाय पाणी नमुने घेतल्याचा तक्ता व तपासणी अहवालाच्या प्रती | :- |
| १७. | पाणी दूषित दिसून आल्यास ज्या पत्राने/तारेने/फोन ज्या सूचना दिल्या त्याच्या प्रती. | :- |
| १८. | लिकेजेस / नळ गळतीमुळे जर साथ उद्भवली असेल तर त्याचे नक्की ठिकाण. (सविस्तर स्थितीदर्शक नकाशा) | :- |
| १९. | नळ गळत्याचा आकडा व तारीखवार दुरुस्ती केल्याच्या अहवालाच्या प्रती. | :- |
| २०. | विहिरीच्या हातपंपाच्या पाण्यामुळे साथ उद्भवली असल्यास त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल. | :- |



१०७

साथीचे रोग उद्रेक स्वरुपात झालेल्या गावाच्या ५ कि.मी. अंतराच्या परिसरामध्ये प्रतिबंधात्मक उपाय म्हणून केलेल्या योजनांची माहिती सादर करण्याकरिता नवीन विहित नमुना :-

---

## तक्ता क्र. ४

१. लागणग्रस्त गावाचे नांव :-

२. लागणग्रस्त गावाच्या ५ कि.मी. अंतरामध्ये असलेल्या गावांची नांवे :-

३. गाव निहाय लोकसंख्या :-

४. प्रत्येक गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या पुरवठयाची व्यवस्था. :-

५. प्रतिबंधक लसटोचणी किती व्यक्तींना टोचली :-

६. एकूण किती पिण्याच्या पाण्याचे नमुने घेतले ? :-

निष्कर्ष :- पिण्यास योग्य

पिण्यास अयोग्य

७. गावानिहाय पिण्याच्या पाण्याचे विहिरीचे नियमित निर्जुंतुकीकरण :-

अ) खाजगी विहिरी

ब) सार्वजनिक विहिरी

८. प्रत्येक गावामध्ये इतर मार्गाने होणाऱ्या पाणी पुरवठयांच्या नियमित निर्जुंतुकीकरणाबाबत. :-

अ) जॅकवेल

ब) हापसे

क) विहिरीवरील विजेच्या पंपाद्वारे पुरविण्यात येणारे

ड) झरे, ओढे

इ) इतर

९. शेरा :-



९०८

## तक्ता क्र ५

## मृत्यू संशोधन अहवाल

रोगाचे नांव :- -----------------------------

१. मयताचे नांव :-

२. वय/लिंग :-

३. संपूर्ण पत्ता :-

गाव :-

तालुका :-

४. गावाची लोकसंख्या :-

५. रोग लक्षणे :-

६. रोग लक्षणे सुरु झाल्याची तारीख :-

७. दवाखान्यात दाखल झाल्याची तारीख व वेळ :-

८. उपचार सुरु केल्याची तारीख व वेळ :-

९. मृत्यूची तारीख व वेळ :-

१०. रोग होण्याची कारणे (दुषित पाणी , अन्न, इतर) :-

११. उपचार कोणी केले व कोठे :-

१२. दवाखान्यात भरतीच्या वेळी रुग्णांची स्थिती :-

१३. केलेल्या उपचाराचा तपशिल :-

१४. जलसंजिवन (ओ आर एस) चा वापर केला होता काय :-

१५. दवाखान्यात औषधांचा पुरेसा साठा होता काय ? :-

१६. संबंधित रुग्णाचा शौच/उलटी, रक्त व इतर नमुना तपासणीसाठी घेतला होता काय ? :-

१७. शौच, उलटी, रक्त तपासणी अहवाल :-

१८. वैद्यकीय अधिकारी, यांचा निरिक्षण शेरा :-

१९. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा निरिक्षण शेरा :-

## ग्रामीण पाणी शुध्दीकरण व साथरोग नियंत्रण

### कृती योजना

| अ.क्रं. | कृती | प्रत्यक्ष कृतीस जबाबदार व्यक्ती | संनियत्रण करण्यास जबाबदार व्यक्ती | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | ग्राम पंचायत स्तरावर करावयाची कार्यवाही | | | | |
| १. | ग्रामपंचायतीमधील गावासाठी ब्लीचिंग पावडरसाठी अतिरिक्त निधी मागणीचा प्रस्ताव प्रपत्र ड-१ मध्ये तयार करुन गट विकास अधिकारी यांना पाठविणे. | ग्रामसेवक ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता समिती | गट विकास अधिकारी | दरवर्षी फेब्रुवारी अखेर | |
| २. | दैनंदिन पाणी शुध्दीकरणासाठी गाव पातळीवर व्यक्ती नेमून जबाबदारी निश्चित करणे व नावे गट विकास अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांना कळविणे. | - "- | - "- | - "- | |
| ३. | दैनंदिन पाणी शुध्दीकरणाची नोंदवही गावात/ग्राम पंचायत कार्यालयात ठेवणे व नोंद तपासणी. | - "- | - "- | दरमहा | सर्व पाणी साठयाची नोंद रजिस्टरमध्ये करुन त्यातील पाणी साठा किती आहे याची नोंद ठेवावी. |
| ४. | गावात साथ उद्भवल्यास त्वरित माहिती वैद्यकीय अधिकारी, प्रा. आरोग्य केंद्र यांना कळविणे. | ग्रामसेवक/सरपंच | - "- | सतत | |

## गट स्तरावर करावयाची कार्यवाही

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १. | ब्लीचिंग पावडर खरेदीसाठी पंचायत समिती सेस अनुदानात तरतूद करणे सक्षम ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकात नोंद करणे. | गट विकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) | फेब्रुवारी अखेर | |
| २. | ग्रामपंचायतीकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करुन ग्रामपंचायतीना ब्लीचिंग पावडर पुरविणे व अतिरिक्त मागणीचा प्रस्ताव (गोळया/द्रव इ. साठी ) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे प्रपत्र ड-२ मध्ये पाठविणे. | विस्तार अधिकारी (आरोग्य) | - "- | १५ मार्चपर्यत | |
| ३. | ब्लीचिग पावडर खरेदी करणे. | गट विकास अधिकारी | - "- | ३१ मार्च पूर्वी | |
| ४. | ब्लीचिंग पावडरचा नमुना प्रयोग शाळेत पाठवून दर्जा अहवाल घेणे | विस्तार अधिकारी (आरोग्य) | अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र | दरमहा | |
| ५. | ब्लीचिंग पावडरचा त्रैमासिक पुरवठा ग्राम पंचायतींना करणे. | गट विकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | प्रत्येक त्रैमासिकांचा पहिला आठवडा | |
| ६. | प्राथमिक सर्वेक्षणात लाल रंगाचे प्रमाणपत्र मिळालेल्या जोखीमग्रस्त गावांची यादी करणे वैद्यकीय अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविणे. | - "- | जिल्हा आरोग्य अधिकारी मु.का.अ. | जानेवारी | |
| ७. | टंचाईग्रस्त/जोखमीचे गावांना टॅकर/बैलगाडीद्वारे शुध्दीकरण केलेल्या पाण्याचा पुरवठा करणे व नोंद ठेवणे. | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) | गट विकास अधिकारी | एप्रिल/मे/जून | |
| ८. | साथीच्या काळात गावांस भेट देऊन मार्गदर्शन करणे, दोषी आढळल्यावर कार्यवाही करणे. | गट विकास अधिकारी वै.अ., प्रा.आ.केंद्र | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.आ.अ. | दरमहा | |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ९. | पंचायत समिती मासिक सभेत, साथ उद्रेक, पाणी शुध्दीकरण कामाचा आढावा घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल सादर करणे. | गट विकास अधिकारी<br>वै.अ.प्रा.आ.केंद्र | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) | | |
| १०. | शुध्द पाणी पुरवठयाबाबत होत असलेल्या कार्याची प्रत्येक गावास भेट देउन पाहणी करणे व अहवाल गट विकास अधिकारी यांना सादर करणे. | वैद्यकीय अधिकारी (प्रा.आ.केंद्र)/विस्तार अधिकारी (आरोग्य) | गट विकास अधिकारी | दरमहा | |
| ११. | ग्रामसेवक पाणी शुध्दीकरणासाठी जबाबदार व्यक्तींसाठी प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण/ पुन:प्रशिक्षण आयोजित करणे. | वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र | जिल्हा आरोग्य अधिकारी | मे/नोव्हेंबर | |
| १२. | टॅकरद्वारे पाणी पुरवठा पाण्याचे ओ.टी. चाचणीद्वारे परिक्षण<br>-गावातील पाणी शुध्दीकरण होत असल्याचे ओ.टी. चाचणीक्षरे परीक्षण | आरोग्य (स)<br>आरोग्य सेवक (पु) | वै.अ.,प्रा.आ.केंद्र<br>-"- | <br>दरमहा | |
| १३. | पाणी नमुने तपासणीसाठी प्रत्येक गावातून पाठविणे.<br>-जोखीमग्रस्त गावातून पाणी नमुने पाठविणे | - "-<br>- "- | - "-<br>- "- | दरमहा<br>दरमहा | |
| १४. | साथग्रस्त गावाची माहिती मिळताच त्वरित भेट देऊन उपचाराची व्यवस्था, पाणी निर्जतुकी सर्वेक्षण, इ. प्रतिबंधक कार्यवाही करणे. | वैद्यकीय अधिकारी (प्रा.आ.केंद्र) | गट विकास अधिकारी<br>जि.आ.अ. | आवश्यकतेनुसार | |
| १५. | साथ संबंधी औषध साठा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन घेणे | वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र | जि.आ.अ. | -"- | |
| १६. | साथ संबंधी (विहित नमुन्यात) अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सादर करणे. | -"- | गट विकास अधिकारी | -"- | |

## जिल्हा स्तरावर करावयाची कार्यवाही

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १. | जिल्हयातील प्रत्येक गाव/वाडयातील पूर्ण झालेल्या व कार्यान्वित योजनाचे सर्वेक्षण (दि. ११.१.९४ चे ग्रा.वि. व ज.सं.वि. चे परिपत्रकातील सुचनेनुसार) ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत करावयाचे आहे. त्याचे अहवाल वैद्यकीय अधिकाऱ्यांचे दाखलयासह सर्व गटांकडून मागवून त्याचे संकलन करणे. | कार्यकारी अभियंता (परिसर अभियांत्रिकी कार्यकारी अभियंता (लघुपाटबधारे) वरिष्ठ वैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद | दरवर्षी जानेवारीच्या प्रथम आठवडयाअखेर | |
| २. | ज्या योजनांच्या बाधकामात बिघाड/दोष आढळून आले आहेत. त्यांच्या दुरुस्तीबाबतचा अहवाल तांत्रिक उपसमिती (ग्रा.पा.पु.) यांचेपुढे ठेवणे व अशा योजनांच्या दुरुस्तीसाठी कृती आराखडा तयार करणे. | कार्यकारी अभियंता (लघुपाटबधारे) कार्यकारी अभियंता (परिसर अभियांत्रिकी | जलसंधारण व पिण्याचे पाणी पुरवठा समिती/मुख्य कार्यकारी अधिकारी | जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवडयाअखेर | |
| ३. | जिल्हा सुसूत्रिकरण समितीची मान्यता सदर प्रस्तावास घेणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | जलसंधारण व पिण्याचे पाणी पुरवठा समिती | जानेवारी अखेर | |
| ४. | मंजूर कृती आराखडयानुसार योजना दुरुस्तीची कार्यवाही सुरु करुन पूर्ण करणे. | कार्यकारी अभियंता (लघु पाटबंधारे) कार्यकारी अभियंता (परिसर अभियांत्रिकी) | जलसंधारण व पिण्याचे पाणी पुरवठा समिती/ जिल्हा सुसूत्रीकरण व संनियंत्रण समिती | फेब्रुवारी ते मे अखेर | |
| ५. | ब्लीचिंग पावडर खरेदीसाठी आर्थिक तरतूद मंजूर करुन घेणे. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | आरोग्य समिती | २५ मार्च | |
| ६. | खरेदीचा प्रस्ताव दर करार निश्चित यासाठी कार्यवाही करणे. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | आरोग्य समिती | १ एप्रिल | |
| ७. | खरेदीबाबत आर्थिक तरतूद व कार्यपध्दती बाबत गट विकास अधिकारी यांना आदेश निर्गमित करणे. | -"- | -"- | -"- | |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ८. | पंचायत समितीला भेट घेऊन पाणी शुध्दीकरणासाठी नियंत्रणाबाबतचा अहवाल सादर करणे. | प्रति.नि.आ.अ./ सहाय्यक जि.आ.अ./ जि.आ.अ./ उप मु.का.अ. (ग्रा.पं.) | आरोग्य समिती | दरमहा | |
| ९. | पाणी शुध्दीकरण, साथ रोगाबाबत सद्यस्थिती आरोग्य समितीस अवगत करणे. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हा आरोग्य अधिकारी | -"- | दरमहा | |
| १०. | साथ उद्रेक गावांना भेटी देणे<br>अ) १ ते २५ पर्यन्त लागणग्रस्त गावे<br>ब) २५ पेक्षा जास्त लागण. | वै.अ./जि.आ.अ./ गट विकास अधिकारी<br>सहा. आयुक्त (विकास)<br>/उपसंचालक आरोग्य अधिक्षक अभियंता | जि.आ.अ.<br>-----------<br>मु.का.अ.<br>आरोग्य समिती | आवश्यकतेनुसार | साथ प्रतिबंधक उपायात निष्काळजीपणा वा त्रुटी राहू नये, मार्गदर्शनासाठी अधिकाऱ्यांच्या भेटीचा उपयोग व्हावा. |
| ११. | एकही सुरक्षित पाणी पुरवठयाचा उद्‌भव नसलेल्या गावासाठी सुरक्षित पाणीपुरवठा योजना तयार करणे आदिवासी विभागात प्राधान्य देणे. | कार्यकारी अभियंता (ल.पा.) जि.प.<br>--------------------<br>(परिसर अभियांत्रिकी) | मु.का.अ.<br>-----------------<br>जिल्हा सुसूत्रीकरण व संनियंत्रण समिती. | आवश्यकतेनुसार | |
| १२. | मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावर मासिक सभेत आढावा. | सर्व संबंधित अधिकारी | मु.का.अ. | दरमहा | |
| १३. | विभागीय स्तरावर आयुक्तांचा सभेत आढावा सादर करणे. | मु.का.अ./उप मु.का.अ./जि.आ.अ./ उपसंचालक (आ.से) | विभागीय आयुक्त | दरमहा | |